# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

निष्काम जन सेवायै समर्पिता

## दिनांक १६-०४-२०१८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

दिनांक १६ एप्रिल २०१८ रोजी (का.प.क्र.१०) मा.महापौर श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे सकाळी ११.३५ वा.वंदेमातरम् या गीताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.नवल किशोर राम, भाप्रसे नगर सचिव श्री.डी.डी.सुर्यवंशी व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. | स.स. श्री.विजय साईनाथ औताडे |
| २. | स.स. श्री.गजानन रामकिसन बारवाल |
| ३. | स.स. श्री.विकास रतनलाल जैन |
| ४. | स.स. श्री.खान फेरोज मोईनुद्दीन |
| ५. | स.स. श्री.बमणे पुनमचंद सोनाजी |
| ६. | स.स. श्री.जाधव बन्सी ग्यानू |
| ७. | स.स. श्री.वाघमारे रुपचंद लक्ष्मण |
| ८. | स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग |
| ९. | स.स. श्री.राजगौरव हरिदास वानखेडे |
| १०. | स.स. श्रीमती रोजतकर पुष्पा उत्तमराव |
| ११. | स.स. श्री.सुरे सीताराम इसराम |
| १२. | स.स. श्रीमती स्वाती किशोर नागरे |
| १३. | स.स. श्री.सचिन सुर्यकांत खैरे |
| १४. | स.स. श्रीमती निकाळजे आशा विजय |
| १५. | स.स. श्री.शेजवळ सुभाष सयाजी |
| १६. | स.स. श्री.रावसाहेब राधाकिसन आमले |
| १७. | स.स. श्रीमती दाभाडे प्रेमलता मिलींद |
| १८. | स.स. श्री.अफसर खॉन यासीन खॉ |
| १९. | स.स. श्री.सय्यद मतीन रशीद |
| २०. | स.स. श्रीमती तसनीम बेगम अ.रऊफ |
| २१. | स.स. श्रीमती खान सायरा बानो अजमल |
| २२. | स.स. श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन |
| २३. | स.स. श्रीमती शेख नरगीस सलिम |
| २४. | स.स. श्रीमती खरात सिमा गणपत |
| २५. | स.स. श्रीमती शोभा नारायणराव वळसे |
| २६. | स.स. श्री.चित्ते नितीन रमन |
| २७. | स.स. श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर |
| २८. | स.स. श्रीमती सोनवणे भारती महेंद्र |
| २९. | स.स. श्रीमती शबनम बेगम कलीम कुरेशी |

इति.स.सा सभा दिनांक १६-४-२०१८
(कार्यक्रम पत्रिका क्रमांक-१०)

| | |
|---|---|
| ३०. | स.स. श्रीमती संगिता सुभाष वाघुले |
| ३१. | स.स. श्री.मलके गोकुलसिंग संपतसिंग |
| ३२. | स.स. श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप |
| ३३. | स.स. श्री.शिंदे राजु रामराव |
| ३४. | स.स. श्रीमती खरात सुरेखा गौतम |
| ३५. | स.स. श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी |
| ३६. | स.स. श्री.खान इरशाद इब्राहिम |
| ३७. | स.स. श्रीमती नसीम बी सांडु खॉ |
| ३८. | स.स. श्री.अजीम अहेमद रफीक |
| ३९. | स.स. श्रीमती खतीजा कुरैशी छोटू कुरैशी |
| ४०. | स.स. श्री.ढगे गंगाधर नामदेव |
| ४१. | स.स. श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखॉ |
| ४२. | स.स. श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे |
| ४३. | स.स. श्री.एडके विकास प्रकाश |
| ४४. | स.स. श्रीमती चावरीया बबीता विजय |
| ४५. | स.स. श्री.भादवे रामेश्वर बाबुराव |
| ४६. | स.स. श्री.बल्लाळ मनोज आसाराम |
| ४७. | स.स. श्रीमती मलेका बेगम हबीब कुरैशी |
| ४८. | स.स. श्रीमती  पठाण अस्मा फिरदोस रफीक पठाण |
| ४९. | स.स. श्री.जायभाय रमेश भानुदास |
| ५०. | स.स. श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी |
| ५१. | स.स. श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख |
| ५२. | स.स. श्री.दांडगे शिवाजी भाऊसाहेब |
| ५३. | स.स. श्रीमती देसरडा राखी प्रशांत |
| ५४. | स.स. श्रीमती जोहरा बी नासेर खान |
| ५५. | स.स. श्रीमती रेशमा अशफाक कुरेशी |
| ५६. | स.स. श्रीमती बोर्डे सरीता अरुण |
| ५७. | स.स. श्रीमती वाडकर शिल्पाराणी सागर |
| ५८. | स.स. श्रीमती बनकर विजया संजय |
| ५९. | स.स. श्री.साळवी नितीन दशरथ |
| ६०. | स.स. श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे |
| ६१. | स.स. श्रीमती कुलकर्णी जयश्री सुरेंद्र |
| ६२. | स.स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत |
| ६३. | स.स. श्री.मनगटे गजानन भानुदास |
| ६४. | स.स. श्रीमती देशमुख माधुरी मिलींद |
| ६५. | स.स. श्री.जगताप भाऊसाहेब उत्तमराव |
| ६६. | स.स. श्रीमती नरोटे कमल रामचंद्र |
| ६७. | स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव |
| ६८. | स.स. श्रीमती चव्हाण सुनिता रामराव |

| | |
|---|---|
| ६९. | स.स. श्री.भगवान (बापु) देविदास घडमोडे |
| ७०. | स.स. श्रीमती ज्योती सुनिल नाडे |
| ७१. | स.स. श्रीमती मुंढे मनिषा बाळासाहेब |
| ७२. | स.स. श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड |
| ७३. | स.स. श्रीमती मिना रामदास गायके |
| ७४. | स.स. श्री.पवार आत्माराम माणिकराव |
| ७५. | स.स. श्रीमती विमल गोविंद केंद्रे |
| ७६. | स.स. श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल |
| ७७. | स.स. श्री.थोरात दिलीप गंगाधर |
| ७८. | स.स. श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ |
| ७९. | स.स. श्रीमती सुमित्रा गिरीजाराम हाळनोर |
| ८०. | स.स. श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद |
| ८१. | स.स. श्रीमती विमल जनार्धन कांबळे |
| ८२. | स.स. श्रीमती मुल्ला सलीमा बेगम खाजोददीन |
| ८३. | स.स. श्रीमती शोभा गरुलिंगअप्पा बुरांडे |
| ८४. | स.स. श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे |
| ८५. | स.स. श्रीमती सलीमा बाबुभाई कुरेशी |
| ८६. | स.स. श्री.जंजाळ राजेंद्र हिम्मतराव |

**<u>नामनिर्देशित पालिका सदस्यांची नावे</u>**

१. श्री.घोडके कचरु छगनराव
२. श्रीमती आऊलवार सुनिता तुकाराम
३. श्री.कांबळे चेतन जनार्धन

(या वेळी दै.सामनाचे संपादक श्री.गणेश तुळशी यांचे मातोश्री स्व.सुनंदा तुळशी तसेच देशाच्या सिमेवर शहीद झालेले स्व.श्री.शुभम मुस्तापूरे आणि श्री.किरण थोरात तसेच श्री.फईम कादरी तसेच उद्योगपती स्व.श्री.प्रकाशजी बाफना यांचे निधन झाल्याने तसेच कु.हसीफा या बाल कन्येवर जो बलात्कार होऊन निघृण हत्या झाली. या सर्वांना सभागृहातर्फे दोन मिनिट स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.)

श्री.त्र्यंबक तुपे :ऑलिम्पिक स्पर्धेत जे खेळाडू विजेते झाले त्यांनी गोल्ड-मेडल मिळविले. या सर्व खेळाडूंचा अभिनंदनाचा ठराव मंजूर करावा.

श्री.रेणुकादास वैद्य :कु.रिध्दी सिध्दी प्रवीण हत्तेकर हिने ऑलिम्पिक स्पर्धेत रौप्य मेडल मिळविले. पुढच्या स्पर्धेसाठी तीला जायचे आहे. आर्थीक मदतीचा प्रस्ताव ठेवला. खेळांडूना मनपाने भरीव मदत करायला पाहिजे. ठराव पारीत होतात. परंतु मदत वेळीच दिली जात नाही. तीन महिन्यापूर्वी वेट लिफ्टींग असोसिएशनला आर्थीक मदत देण्याचा प्रस्ताव घेतला होता. दोन वेळेस स्पर्धेची तारीख बदलली. परंतु मदत दिली गेली नाही. याची दखल वेळीच घ्यावी.

श्री.प्रमोद राठोड :बीडचे कु.राहूल आवारे यांनी सुध्दा या सपर्धेत सुवर्ण पदक मिळविले. त्यांचे ही अभिनंदन करावे.

श्री.राजगौरव वानखेडे :भारतात एकूण ६६ खेळाडूंना सुर्वण पदक प्राप्त झाले. त्याचे अभिनंदन करावे. तसेच शिवछत्रपती पुरस्कार मिळालेले १६ खेळाडूंचा सत्कार करायचे ठरविले

होते. त्यांचा सत्कार करावा. अशा खेळाडूंना नोकरीसाठी राखीव पदे ठेवता येईल का? त्याचा विचार करावा.

श्री.अब्दुल नाईकवाडी :जो प्रस्ताव ठेवला त्यास अनुमोदन आहे.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर:थायलँड मध्ये झालेल्या १२ वर्षीय खाली असलेल्या बुध्दीबळ चॅम्पियन स्पर्धेत कु.तनीशा बोरामणीकर हिने यश मिळविले तीचेही अभिनंदन करण्यात यावे.

मा.महापौर :ऑलिम्पिक स्पर्धेत देशातील ६६ खेळाडूंनी सुवर्णपदक मिळविले आहे. देशाचे नाव उज्वल केले. रिध्दी सिध्दी प्रवीण हत्तेकर हिला आर्थीक मदत देण्याचा प्रस्ताव आहे. तसेच शिवछत्रपती पुरस्कार विजेते १६ त्यांचा सत्कार १५ दिवसात करण्यात यावा. यांना नोकरीमध्ये आरक्षण देता येईल का? तसे शासनाचेही धोरण आहे विचार करावा. आर्थीक मदत देण्याचा ठराव मंजूर केल्यानंतर तातडीने मदत दिली जावी. ज्यांना ज्यांना श्रध्दांजली अर्पण करतो तसा शोक संदेश संबंधीत कुटूंबीयाना तसे कळविण्यात यावे. यासाठी उपआयुक्त (प्र.) यांनी त्यासाठी कार्यवाही करावी.

श्री.राजगौरव वानखेडे :हडको-सिडको भागात पाणी प्रश्न एन-७ व हरिसिध्दी तसेच जेलच्या टाकीवरून आता ४-५ दिवसानी पाणी येणार असे समजले. नियोजन कसे करणार आहे? सिडको-हडको भागातील नागरिक वेळेवर कर भरतात. त्यांना ४-५ व्या दिवशी पाणी देणार असेल तर अन्याय होईल. काही वार्डात २ दिवसा आड पाणी आहे. पाण्याची अडचण आली की, सदस्यांना टाकीवर जावे लागते हे योग्य नाही. प्रशासनाने नियोजन करावे.

श्री.फेरोज खान :जुन्या शहरात पाण्याचा प्रश्न आहे. वार्डात ९ व्या दिवशी पाणी येते. अभियंते फोन घेत नाही. सर्व वार्डात समान पाणी द्यावे. पाणी मिळत नाही. म्हणून नागरिक घरी येतात.

श्री.प्रमोद राठोड :कोणत्या भागात किती दिवसाआड पाणी पुरवठा होता?

श्री.अफसर खान :विद्यापीठ गेट जवळील टाकीत दोन महिन्यापासून पाणी येत नाही. टाकीची लेव्हल येत नाही. त्यामूळे वार्डात पाणी येत नाही. अनेकदा अधिकारी यांना सांगूनही कार्यवाही होत नाही.

कार्य.अभियंता-पापू :पाणीपुरवठा विस्कळीत होत होता. त्यावर उपाय म्हणून एन-५ च्या टाकीवरून एन-४ भागात फिरून पाणी सोडावे लागत होते. त्यामूळे पुंडलिकनगर टाकीवरून पाणी तेथे जाण्यासाठी पाईप लाईनचे काम सुरू केले. शहागंज टाकीसाठी मुख्य लाईनवरून पाणी जाते. त्यावर इल्लिगल नळ कनेक्शन आहे. ते बंद करण्याची मोहिम हाती घेतली असता, त्यास स.श्री.नासेर सिद्दीकी व स.श्री.फेरोज खान यांनी काम थांबविले. पुंडलिकनगर टाकीवरून दोन दिवसा आड होणारा पाणीपुरवठा (नावे वाचून दाखवतात) या भागात दोन दिवसाआड पाणी येते.

श्री.सिताराम सुरे :शहरात १५० एमएलडी पाणी येते. २५ एमएलडी पाणी इतरत्र जात असेल उर्वरीत १२५ एमएलडी पाणी शिल्लक असते. त्यातून कोठे वाटप होते?

मा.महापौर :पाण्या विषयी बैठक घेतली होती. योग्य ते मार्ग काढणेच्या आयुक्तांनी सुचना दिल्या होत्या. आजच्या परिस्थिती प्रशासनाने काय नियोजन केले? ते सांगावे.

श्री.त्र्यंबक तुपे :पाणीपुरवठ्याच्या ज्या ही संचिका प्रलंबीत असतील त्या निकाली काढाव्यात. बौध्दनगर, उत्तमनगर ची संचिका थांबून आहे. मंजूर होत नाही. आहे त्या पाण्याचे प्लॅनिंग करावे. समांतरच्या बैठका होत आहे. ते यावे म्हणून कमी जास्त पाणी करण्याचे प्लॅनिंग प्रशासन करीत आहे काय? आजपर्यंत उन्हाळ्यामध्ये पाणी देत आलो. १५० एमएलडी पाणी येत असेल तर प्लॅनिंग करावे. समांतरचा परत विषय येतो. त्यांनी काम सुरू केले तरी किमान दोन वर्ष लागतील. तोपर्यंत प्लॅनिंग करणार नाही का? जायकवाडी ते फारोळा पर्यत लाईन टाकता येईल का? ते पहावे. ज्या ठिकाणी मागणी आहे तेथे पाणी देण्याचा प्रयत्न करावा. पंप खराब होतो. तर एक्स्ट्रा प्लॅनिंग का होत नाही?

मा.आयुक्त :पाणी प्रश्न दोन महिन्यापासून निर्माण झाला. पाणी वितरीत होते. जेवढे जलकुंभ आहे. त्यातून कुठे कुठे पाणी किती दिवसाआड वितरीत होते. याची यादी आहे. शहरासाठी पाहिजे ते पाणी कमी आहे. परंतु जी परिस्थिती निर्माण झाली. त्या संदर्भात सर्व अधिकारी यांची बैठक घेतली होती. स.पदाधिकारी ही होते. किमान सर्वांना पाणी मिळावे अशा सुचना दिल्या होत्या. काही ठिकाणी ६-६ दिवसाआड तर काही ठिकाणी २-२ दिवसाआड पाणी आहे. ५ एमएलडी जास्तीचे पाणी मिळाले तर नियोजन चांगले होईल. ते पाणी एमआयडीसी कडून मिळेल यासाठी प्रयत्न चालू आहे. तीन दिवसात नियोजन करण्याचे सांगितले होते. आणखी सात दिवस नियोजनासाठी लागेल. पाण्याची आवक पाहिजे तेवढी होत नाही.

श्री.राजू शिंदे :पाणी कमी का येते? नियोजनाचा अभाव आहे. पाच एमएलडीसाठी एमआयडीसीकडे मागणी करावी लागते.

मा.आयुक्त :देखभाल दुरूस्ती व भांडवली कामावर पैसे खर्च होत नाही. जे काम करता त्यांना पेमेंट केले जात नाही.

श्री.राजू शिंदे :जायकवाडीत पाणी आहे. मनपाचे नियोजनाचा अभाव आहे. करोडो रूपयांची इतर कामे करता पाणीपुरवठ्याची कामे का होत नाही? किती पाणी उचलतो? किती पाणी येते? गळती किती होते? ती कमी करावी.

श्री.प्रमोद राठोड :१३५ एमएलडी पाणी येत होते. त्यावेळी नियोजन होते. आताच का नियोजन होत नाही?

श्री.त्र्यंबक तुपे :जे आवश्यक कामे आहे, त्यासाठी पैसे खर्च केले जात नाही.

मा.महापौर :मा.आयुक्तांना व्हिडीओ कॉन्फरन्ससाठी जायचे आहे. एक तासानंतर आयुक्त पुन्हा सभेसाठी येणार आहे.

(या वेळी आयुक्त म्हणून अति.आयुक्त स्थानापन्न होतात.)

श्री.फेरोज खान :मा.आयुक्त येईपर्यत सभा तहकूब करावी. दोन दिवसाआड पाणी कुठे दिले जाते? त्याची माहिती द्यावी.

कार्य.अभियंता-पापू :१५० एमएलडी पाणी उचलतो. १३५ एमएलडी पाणी येते.

श्री.राजू शिंदे :१३५ एमएलडी पाणी येत असेल व त्यातून ३ एमएलडीच पाणी सिडकोसाठी का जात आहे?

(या वेळी अनेक सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

श्री.भगवान घडमोडे :पाणीपुरवठ्यासाठी नियोजन काय केले? अडचणी काय आहे?

श्री.नितीन चित्ते :सिडको-हडको भागात आता ५ व्या दिवशी तर इतर भागात दोन दिवसाआड पाणी असे का होते? सर्व वार्डासाठी समान पाणी द्यावे सिडकोसाठी आलेली एक्सप्रेस लाईन वरील कनेक्शन तात्काळ बंद करावे.

श्री.रावसाहेब आमले :पडेगाव, मिटमिटा,भावसिंगपूरा भागात सुध्दा आजपर्यत पाणी दिले जात नाही.

श्री.प्रमोद राठोड :एक्सप्रेस लाईनवर का कनेक्शन दिले गेले?

(या वेळी सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

श्री.राजगौरव वानखेडे :सिडको हडको भागात ५ व्या दिवशी पाणी का देत आहोत?

श्री.रेणुकादास वैद्य :आमच्या वार्डात देखील पाणी येत नाही.

मा.महापौर :सभा तहकूब करण्यात येते (वेळ १२-२५ वाजता पुन्हा सभा १-४५ वाजता सुरू)

मा.महापौर :आता माहिती मिळाली की, मा.जिल्हाधिकारी तथा मनपा आयुक्त यांची बदली पुणे येथे झाली आहे. कदाचित ते सभेला येणार नाही. पाण्याचा विषय झाला की कचऱ्याचा विषय घेऊ.

श्री.भगवान घडमोडे :कचरा या विषयावर स्पेशल बैठक घ्यावी.

श्रीमती शोभा बुरांडे :ड्रेनेजचे पाणी पिण्याच्या पाण्यात येते, दखल घ्यावी. कमी दाबाने पाणी येते. नागरीक घरी येतात. टाकीची लेव्हल येत नाही त्यामूळे पाणी कमी येते.

श्रीमती मुल्ला सलीमा बेगम:माझे वार्डात सहा महिन्यापासून पाण्याची टंचाई आहे. प्रेशरने पाणी येत नाही. काही घरांना पाणीच मिळत नाही. पाणी टंचाई असतांना वॉर्डाच्या बाजूलाच नवीन ३०० मी.मी.व्यासाची नवीन लाईनचे काम दिले आहे. माझे वार्डातील एकही काम केले जात नाही.

श्रीमती जयश्री कुलकर्णी:माझे वार्डात ८ दिवसा पासून पाण्याचे वेळपत्रक बदलले. कमी दाबाने पाणी येते. दोन तीन गल्ल्यांमध्ये खराब पाणी येते.

श्रीमती कमल नरोटे :मुकूंदवाडी भागात पाण्याची वेळ नाही. कमी दाबाने आणि ६-७ व्या दिवशी पाणी येते. नियोजन करावे.

श्रीमती नरगीस शेख :आंबेडकर जयंतीच्या दिवशी नागरीकांना पाणी नव्हते. टॅंकरने पाणी मागितले. समान पाणी वाटप करावे.

श्रीमती अर्चना निळकंठ :दुषित पाणी येते. टाकीची लेव्हल येत नाही. अपार्टमेन्टमध्ये पाणी जात नाही.

श्रीमती सिमा खरात :सिडका-हडकोत पाचव्या दिवशी पाणी का येते? डी-सेक्टर मध्ये १० तारखेला पाणी दिले. नंतर १४ तारखेला पाणी यायला पाहिजे, आले नाही. रविवार सुटी असल्याने व्हॉल्व्ह खोलता येत नाही असे सांगतात. ७ दिवसापासून त्या भागात पाणी नाही. आता ते लोक आंदोलन करण्याचा पवित्रा घेणार आहे. ४० मिनिटात, १० मिनिट फक्त हवाच येते.

श्रीमती सायरा बानो :शहरात येणारे पाणी किती? शहांगज टाकीवरून सप्लाय होणारे पाणी आता त्याभागात ६ दिवसाआड पाणी येत आहे. पाण्याची वेळ निश्चित असावी. समान पाणी सर्व भागात द्यावे. एक तास पाणी द्यावे.

श्रीमती मनीषा मुंढे :१०-१५ मिनिटे पाणी व सहाव्या दिवशी पाणी येते. अगोदर हवा येते. घाण पाणी येते. सर्वांना समान पाणी द्यावे.

श्रीमती ज्योती नाडे :५-६ व्या दिवशी पाणी येते तेही घाण, पाण्याचे नियोजन व्हावे.

श्रीमती संगिता वाघुले :मिसरवाडी भागात २५ वर्षात एकही पाण्याची लाईन टाकली जात नाही. गुंठेवारीतही लाईन टाकावी. पाण्याचा प्रश्न सुटेल.

श्रीमती स्वाती नागरे :हडको-सिडकोत पाणी येण्यासाठी टाकी भरण्यात यावी. जास्त दाबाने पाणी यावे. दोन दिवसा आड पाणी यावे. काही घरांना पाणी येत नाही.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर:टाक्या भरत नाही प्रेशर नसते. घाण पाणी येते.

श्रीमती सरीता बोर्डे :पिण्याच्या पाण्यात दुषित पाणी येते. पाणी कमी येते व वेळेवर येत नाही.

श्रीमती सिमा चक्रनारायण:कमी दाबाने पाणी येते व घाण येते. पाण्याची वेळ निश्चित नाही. सिमेंट लाईन बदलण्यात यावी.

श्रीमती सुनिता आऊलवार:प्रतापनगर भागात दुपारी पाणी येते. अनेक नागरीक घरी नसतात. सकाळच्या वेळेत पाणी मिळावे.

श्रीमती ज्योती पिजंरकर:३०-३५ मिनिटे पाणी येते. पाण्याची वेळ निश्चित नाही. कमी दाबाने पाणी येते.

श्रीमती पुष्पा रोजतकर :दोन महिन्यापासून यादवनगर भागात पाणी येत नाही.

श्रीमती माधुरी देशमुख :लिगल, इल्लिगल कनेक्शन किती? पुंडलिकनगरच्या टाकीतून पाणी वाढविणेसाठी जीवन प्राधिकरणाने ६८ कोटी रुपये दिले होते त्यातून कोणती कामे केली? किती एमएलडी पाणी द्यावे असे होते. टाकी केली तेंव्हा किती एरीया होता? व किती भागांना पाणी देणार होते? १५० एमएलडी पाणी लिफ्ट होते. १३५ एम.एल.डी. पाणी शहरात येते. तर १५ एमएलडी पाणी कुठे जाते? त्यातील सिडकोसाठी ४५ एमएलडी पाणी येते. आज स्थितीस ३-४ एमएलडीच पाणी येते. बाकी पाणी कुठे जाते? एन-५ च्या टाकीवर किती पाणी येते? दुषित पाणी का येते? एन-५ च्या टाकीवर पाणी स्वच्छ करणेसाठी मशीन आहे ते दुरूस्त का केले नाही? माझे वार्डातील कामाची निविदा होती त्याचे काय झाले? ९० दिवस पाणी देत असतांना वर्षभराची पाणीपट्टी घेऊ शकतो का?

श्रीमती सुरेखा सानप :फुलेनगर भागात सहा महिन्यापासून दुषित पाणी येते. काम होत नाही. र.रु.पाच लक्षचे काम आहे ते होत नाही. ब्रीजवाडी भागात ७-८ दिवसांनी पाणी येते. नारेगाव शाळेत पाईप लाईन टाकावी. उत्तरानगरीत लाईन नाही. प्रश्न दिले त्यांचे उत्तर दिले नाही. जुन्या पाईप लाईनला दुरूस्तीसाठी किती खर्च केला? तेथे अशी चिकट माती असतांना अशी लाईन का टाकत आहे?

श्रीमती मिना गायके :पुंडलिकनगर,हनुमाननगर भागात प्रत्येक गल्लीमध्ये चार घरांना पाणी येत नाही.

श्रीमती प्रेमलता दाभाडे :३-४ महिन्यापासून पाण्याची समस्या आहे. ७ दिवसाच्या आत कार्यवाही व्हावी.

श्रीमती सुमित्रा हाळनोर :घाण पाणी येते. पाण्याची वेळ निश्चित नाही. काही ठिकाणी पाणी येत नाही.

श्रीमती सुरेखा खरात :कमी दाबाने पाणी येते. वारंवार पाण्याला गॅप दिला जातो.

श्रीमती शोभा वळसे :दुषित पाणी येते. दोन-चार घरांना पाणी येत नाही. अधिकारी फोन उचलत नाही.

श्री.सिताराम सुरे :सिडको-हडको, मयुरपार्क, जाधववाडी, सुरेवाडी, वानखेडेनगर, हर्सुल या परिसरात ११ तारखेपासून तीन दिवसाआड पाणी येत आहे. जायकवाडीतून १५० एमएलडी पाणी येते. १३५ शहरात येते. तीन किंवा चार दिवसाआड पाणी देत असेल तर ४०५ एमएलडी पाणी होते. असे असतांना गॅप व कमी वेळ पाणी देण्याची वेळ का आली? नियोजन नाही. पाणी तेवढेच येत आहे. यापुर्वी एक, दोन दिवसाआड पाणी येत होते. आता गॅप का दिला जातो? २०० एमएलडी पाणी चोरी होत आहे. माझे वार्डात दोन महिन्यापासून तीन गल्ल्यांमध्ये दुषित पाणी येते. चार गल्ल्यांमध्ये १५-२० घरांना पाणी येत नाही.

श्री.नासेर सिद्दीकी :१३५ एमएलडी पाणी दररोज येत असेल तर ४-५ दिवसाआड पाणी देतो तर एवढे येणारे पाणी कुठे जात आहे? पंचायत समिती कॉर्टरचा एक भाग आहे तेथील पाणीपुरवठ्याची एक संचिका ८-९ महिन्यापासून थांबून आहे.

श्री.गजानन मनगटे :२-३ वर्षापासून जोपर्यत जायकवाडी ते फारोळा लाईन होणार नाही. तोपर्यत शहरात नवीन लाईन टाकायचा नाही. धोरण ठरविले होते. आम्ही नवीन संचिका केल्या नाही परंतु आता न्यायनगर भागात जयदुर्गा कॉलनी, हनुमान मंदीराच्या मागे, गजानननगर मध्ये तसेच श्रीमती मोरे यांचे अर्धा वार्डात पाणी येत नाही. जलकुंभ भरत नाही. असे असतांना नियोजन होत नाही. व्हॉल्व्ह बंद करून टाकतात. त्यामूळे जलकूंभ भरत नाही. वार्डात पाणी मिळत नाही. अशा परिस्थितीत आता जलकुभांवरून पाईप टाकण्याचे काम चालू केले. जोपर्यत जलकुंभ भरत नाही. तोपर्यत कुठलेही नवीन काम करू नये.

श्री.नितीन चित्ते :सिडको-हडकोसाठी असलेल्या एक्सप्रेस लाईनवर चार ठिकाणी सप्लाय घेतलेला आहे.आम्हाला पाणी कमी मिळत असेल तर हि जबाबदारी प्रशासनाची आहे. या लाईनवर नवीन लाईन जोडण्याचा घाट प्रशासन करीत आहे. हे योग्य नाही. असे होत असेल तर आम्हाला १५ दिवसाला पाणी देणार काय? एन-५ टाकीवर रात्री येणारे पाणी कमी येते.

श्री.राजेंद्र जंजाळ :दहा वर्षापासून एक्सप्रेस लाईन वरून पाणी घेतले जाते तेंव्हा अडचण निर्माण झाली नाही. आता दोन महिन्यात का झाली?

श्री.नितीन चित्ते :१२ ते ४ या दरम्यान पुंडलिकनगर,शिवाजीनगर पाणी चालू असते तेथे कन्ट्रोल नसते असे म्हणणे आहे. जायकवाडीचा सहावा पंप चालू आहे. एन-५ च्या टाकीवरील ६०,१२० चा पंप रेग्युलर चालू नाही असे सांगतात. आमचा भाग शेवटचा असल्याचे सांगण्यात येते. अनेक ठिकाणी नवीन पाईपलाईन टाकल्या. हे करायचे व जुने भागात पाणी कमी करायचे हे योग्य नाही. या भागातील लोक कर भरतात. हा प्रश्न दरवर्षी निर्माण होतो, तर यात सुधारणा का होत नाही?

श्री.राजेंद्र जंजाळ :पाण्याचा प्रश्न सर्वच भागात निर्माण झाला. माझ्या वार्डात नाथप्रांगण, एमरॉल्ड सिटी, आरबी हिल्स भागात आठ दिवसाला पाणी येते. ग्रॅव्हेटीच्या लाईनवर पुरवठा आहे. कमी दाबाने पाणी येते. पुंडलिकनगर, शिवाजीनगर भागात एक्सप्रेस लाईनवर कधी पासून पाणी घेतले जाते? या विभागाची यंत्रणा कार्यान्वित नाही. या भागात तीन दिवसाआड पाणी येते तर बाकीच्या दोन दिवसातून सिडको एन-५ ला पाणी का जात नाही? प्रशासन यंत्रणा न राबविता अमुक ठिकाणी पाणी पळविले असे उत्तर देणे योग्य नाही. आताच पाणी प्रश्न का निर्माण झाला? प्रशासनाचा दुसरा काही दृष्टीकोन आहे का? शहरात इल्लिगल कनेक्शन किती? ते काढणेसाठी काय कार्यवाही केली? ते काढणेस कोण विरोध करते? जे लोक टॅक्स भरतात. त्यांना पाणी का दिले जात नाही? जे चोरीने पाणी घेतात त्यांच्यावर कार्यवाही करावी. जे कर भरतात त्यांना पाणी देणार नाही काय?

श्री.प्रमोद राठोड :उपअभियंता श्री.खाजा यांना येथे बोलवावे. त्यांनी म्हटले होते की, एन-५ च्या टाकीवर गॅप देतो. ते आमचे आपसात भांडण लावतात. एन-५ टाकीवर ते नसतात.

श्री.रेणुकादास वैद्य :पुर्ण शहरात समस्या आहे. कारण नसतांना अधिकारी सदस्यांमध्ये मिसगाईड करतात. नियोजन करण्याचे सोडून वेगळी उत्तरे देतात. सर्व टाक्या भरण्याची सिस्टम शेवटून चालू केली, तर सर्व भागाचा पाणीप्रश्न सुटेल. नक्षत्रवाडी ते क्रांतीचौक पर्यंत लाईन येते. त्या ट्रॅकवर चांगला पाणीपुरवठा होतो. इतर भागात योग्य पाणी येत नाही. सर्व अधिकारी यांना एकत्र बोलवून वर्कआऊट करण्याची गरज आहे. टाक्याची लेव्हल बरोबर नाही. योग्य नियोजन करावे. आता तीन दिवसाआड पाणी येते,दुर्देवी बाब आहे. ज्या पध्दतीने पुर्वी पाणी देत होतो, त्याच पध्दतीने द्यावे.

श्री.बन्सी जाधव :म्हसोबानगर भागात दोन महिन्यापासून पाणी नाही. पाईप लाईन टाकावी.

श्री.आत्माराम पवार :पुंडलिकनगर, गजाननगर, भारतनगर भागात पाणी येत नाही. जेथे पाणी देत नाही वसुली केली जाते. तीन दिवसाआड पाणी देते, जनता सहन करणार नाही.

श्री.सचिन खैरे :हनुमान टेकडीची टाकी शहराच्या शेवटी आहे. माझ्या वार्डात अनेक भागात पाणी येत नाही. चांगले पाणी येण्यासाठी बुस्टर बसविणार होते. अद्याप काम केले नाही.

श्री.विकास एडके :माझे वार्डात प्रेशरने पाणी येत नाही. दुरूस्तीची कामे तक्रार देऊन हि होत नाही.

श्री.अजीम अहेमद :वार्डात पाणी पुरवठा विस्कळीत झाले. पाच-सहा दिवसाआड पाणी येते.

श्री.भगवान घडमोडे :काही वार्डात १ तर काही वार्डात २ दिवसाआड तर काही भागात दररोज पाणी तर काही ठिकाणी ५-६ दिवसाआड पाणी येते. मुख्य लाईनवर सतत पाणी येते. या बाबत नियोजन केले जावे. सर्व भागात पाणी देण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे. कोणत्या वार्डात किती दिवसाआड पाणी येते? शेवटून टाक्या भराव्यात उंचावरील टाकी अगोदर भरावी. आमचे वार्डात येणारे पाण्याची वेळ निश्चित नाही. प्रशासनाची अडचणी काय आहे?

श्रीमती राखी देसरडा :पाण्याची वेळ निश्चित नाही. रात्री १०-११ वाजता पाणी येते.

श्री.भाऊसाहेब जगताप :५-६ व्या दिवशी व रात्री १२ वाजेला पाणी येते, कधी तीन पर्यत पाणी येते. वेळ निश्चित नाही. अंबिकानगर भागात दुषित पाणी येते. १०-१५ मिनिट ड्रेनेज पाणी येते. यावर उपाय काढावा. सर्व वार्डात समान पाणी द्यावे.

श्री.त्र्यंबक तुपे :शहरात अनधिकृत नळ किती? ते बंद का होत नाही? मुख्य लाईनवर कमर्शियल नळ घेतले. पाण्याचा दुरूपयोग केला जातो. गंभीर दखल घेतली तर पाणी बचत होईल व वापरात आणता येईल. पाणी टंचाई येऊ नये यासाठी पंप बंद होतात. एक्स्ट्रा व्यवस्था का होत नाही? जवाहरकॉलनी भागात आता सुध्दा पाणी येत नाही. अनेक अर्ध्या भागात पाणी येत नाही. टँकरने जाणारे पाण्याचे ऑडीट असावे किती पाणी विकतो? अनेक टाक्या भरल्या जात नाही. पाणी देण्यासाठी भेदभाव नसावा.

श्री.राजू शिंदे :चर्चा वरती आऊट-पुट निघत नाही. अधिकारी सहकार्य करीत नाही. शहरात येणारे पाणी कमी नाही. परंतु नियोजन नसल्यामूळे ही परिस्थिती निर्माण झाली. १५० एमएलडी पाणी येते, १३५ शहरात येते. ५८-५६ एमएलडी पाणी सिडकोसाठी जाते. एक महिन्यापासून सिडको-हडको भागात ३-४ एमएलडी पाणी येत आहे. तर उर्वरीत पाणी कुठे जाते? सिडको-हडको भागात पाण्याचा

प्रश्न का निर्माण झाला? सातारा देवळाई भागात पाणीच नाही. या भागासाठी २ एमएलडी पाणी घेण्यात यावे. मिटमिटा, पडेगाव भागात पाणी नाही. किमान उन्हाळाभर सातारा-देवळाई भागात मोफत पाणी देण्यात यावे. पाणी पुरवठा विभागात कुणाचे नियोजन नाही? यावर ठोस निर्णय घ्यावा. एमजीपीचे अधिकारी नियुक्त करावे.

श्री.दिलीप थोरात :आमच्याही भागात पाणी येत नाही. अधिकारी यांनाही सपोर्ट करण्याची गरज आहे. तज्ञ अधिकारी या विभागासाठी घ्यावे. एमआयडीसी कडून ५ एमएलडी पाणी घेतले तर सर्व भागात पाणी मिळेल. ऑरिक सीटीसाठी नवीन लाईन टाकली आहे. त्यातूनही पाणी घेऊ शकतो का? शासनाशी चर्चा करावी. समांतर करण्यासही २ वर्ष लागणार आहे.

मा.महापौर :जे प्रश्न उपस्थित केले त्यांचा श्री.खाजा यांनी खुलासा करावा.

श्री.प्रमोद राठोड :एन-५ च्या टाकीत पाणी का येत नाही?

उपअभियंता (पापू) :एन-५ च्या टाकीवर दोन तास पाणी बंद होते. पुर्ण क्षमतेने पाणी येत नाही. झोन नं.६ मध्ये १४ वार्ड येतात. त्यापैकी विश्रांतीनगर व मुकूंदनगर भागात नवीन लाईन टाकली पाणी देता येत नाही. एन-५ च्या टाकीवरून पाणी दिले जाते. पाण्याची लेव्हल कमी असते. कमी पाणी येते. रात्री मी टाकीवर अनेकदा पाहणी करतो. एन-५ जमा झालेले पाणी वाटप करण्यात येते. सप्लाय ४ ते ७ बंद करायचे आता २४ तास चालू आहे.

श्री.प्रमोद राठोड :इतर ठिकाणी गॅप देत नाही. तर एन-५ च्या टाकीला गॅप का देतो? किती लोक टाकीवर काम करतात?

उपअभियंता :एन-५ च्या टाकीत येणारे पाण्यालाच डिस्टर्ब होते.

श्री.भगवान घडमोडे :एन-५ च्या टाकीचा पुरवठा करणे निश्चित नाही. केंव्हाही ही पाणी येते. एन-५ च्याच टाकीचा पुरवठा डिस्टर्ब होतो असे सांगतात.

श्री.नितीन चित्ते :एन-५ लाच पाणी का मिळत नाही?

मा.महापौर :दोन महिन्यापासून एन-५ च्या टाकीवर पाणीपुरवठा का होत नाही?

श्री.राजेंद्र जंजाळ :टँकर भरले जातात. लोकांना देण्यास पाणी नाही.

श्री.भगवान घडमोडे :एन-५ च्या टाकीवरून अनेक टँकर सदस्यांच्या वार्डात टाकायचे म्हणून दुसरीकडेच विक्री होतात. पाणी तेथे का पडत नाही?

उपअभियंता-पापू :पुर्ण क्षमतेने पाणी येत नाही त्यामूळे टाकी भरत नाही. या लाईनवर चार पम्चर आहे त्यांचा टाईमींग ठरलेला आहे.

श्री.नितीन चित्ते :संबंधीत अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, चार पम्चरमूळे या टाकीवर पाणी कमी येते.

उपअभियंता :सन-२००१ ही लाईन टाकली. त्यावेळी सिडकोला एक दिवसाआड व सिटीमध्ये दररोज पाणी होते. सन-२००८ मध्ये सीटी व सिडको भागात एक दिवसाआड केले. सन-२०१२ पासून पुर्ण शहरात, सिडको व शहरामध्ये दोन दिवसाआड पाणी केले. सन-२०१४ मध्ये कंपनीकडे दिले. त्यांनी पाणीपुरवठा सप्लाय वाढविले. हर्सुल तलाव आटलेला आहे. त्या भागात क्रांतीचौक येथुन पाणी द्यावे लागते.

श्री.प्रमोद राठोड :किती एमएलडी पाणी एन-५ च्या टाकीवर यायला पाहिजे. ३ एमएलडी येते त्या दिवशी सांगण्यात आले.

उपअभियंता :१२-१४ एमएलडी पाणी यायला पाहिजे. आता ७-८ एमएलडी पाणी येते.

श्री.भगवान घडमोडे :एन-५ च्या टाकीवर पाणी का येत नाही? नियोजन कोणाकडे आहे?

श्री.त्र्यंबक तुपे :हर्सुल तलावातून पाणी घेत होते. तेथे पाणी नाही. त्यामूळे आता तेथील भागात पाणी दिले जाते. त्यामूळे आमच्या ४-५ वार्डात पाणी कमी येते. रात्री पाणी देतात. इतर वार्डात पाणी डिस्टर्ब करून दुसरीकडे पाणी देते. त्यांनाही पाणी दिले पाहिजे यासाठी नियोजन केले पाहिजे. तीन दिवसाआड पाणी देता यावर पर्याय काढावा. श्री.फालक हे काय काम करतात? ते स्वत: जबाबदारी घेत नाही. आऊट सोर्सिंगवर जे लोक घेतले त्यांच्या भरवश्यावर काम चालु आहे का?

श्री.राजू शिंदे :टाकी कशी भरेल? हे काम उपअभियंता यांचे आहे. हे काम सोडून दुसरे काम पाहत आहे. इतर पाणी डिस्टर्ब करायचे दुसरीकडे पाणी देणार हे योग्य नाही. श्री.खाजा हे काय काम करतात?

श्री.त्र्यंबक तुपे :खाजगी लोकांना पाणी विकतो ते उन्हाळ्यापुरते बंद करावे.

मा.महापौर :टाकी का भरत नाही? हि जबाबदारी महत्वाची आहे. त्यातून पाणी सोडण्याची जबाबदारी लाईनमनची असते.

उपअभियंता-पापू :टाक्या भरून रेग्यूलर पाणी वाटप करणे, इतर कर्मचारी यांचेशी समन्वय ठेवून सर्वांना पाणी वाटप करावे लागते.

श्री.भगवान घडमोडे :अधिकारी यांना फोन करून सांगावे लागते की, पाणी सोडा अधिकारी पगार घेणार व काम आम्हाला करावे लागते. हे योग्य नाही.

उपअभियंता- :जायकवाडीहून दोन तास पाणी बंद होते.

श्री.भगवान घडमोडे :फक्त एन-५ च्या टाकीवरच पाणी टंचाई का आहे?

मा.महापौर :एमबीआर ते एन-५ एक्सप्रेस लाईन आहे. जायकवाडीहून एमबीआर पर्यत चांगले पाणी आहे, तर एन-५ च्या टाकीवरच का अडचण आहे? या टाकीवर ३०-३५ एमएलडी पाणी ऐवजी ३-४ एमएलडीच पाणी येते. पाणी कमी येणे पाण्याची वेळ निश्चित नाही. दुषित पाण्याचे प्रॉब्लेम असे का होत आहे?

श्री.फेरोज खान :पुर्ण शहरात समान पाणी वाटप करावे.

श्री.प्रमोद राठोड :श्री.खाजा यांना सुट्टीवर पाठवावे. श्री.पदमे यांचेकडे चार्ज द्यावा.

श्रीमती माधुरी देशमुख :एन-५च्या टाकीचे छत पडले आहे. ते पत्रे वगैरे लावून कव्हर केले आता पावसाळा येणार आहे.

उपअभियंता (श्री.फालक):एकूण १३५ एमएलडी पाणी येते. दुपारच्या वेळेत फारोळा येथे येणारे पाणी कमी येते त्यामूळे एक पंप बंद होतो. हर्सुल भागात जायकवाडीहून येणारे ५ एमएलडी पाणी द्यावे लागते. उन्हाळा सुरू आहे पाण्याची डिमांड वाढली आहे.

श्री.राजू शिंदे :फारोळा येथे १३५ एमएलडी पाणी येते पंप बंद होतो. म्हणून शहरात पाणी येत नाही तर बाकीचे पाणी कुठे जाते?

उपअभियंता-श्री.फालक :फारोळा येथे पाणी कमी पडते लेव्हल कमी होते. त्यामूळे पंप बंद करावा लागतो.

श्री.राजू शिंदे :पाण्याची टंचाई ही जाणूनबूजून न होता कृत्रिम पाणी टंचाई निर्माण होत आहे.

मा.महापौर :त्या लाईनची पुर्ण पाहणी करावी. पाणी कसे वाढविता येईल? ते करावे.

श्री.दिलीप थोरात :जायकवाडीतून पाणी कमी का येते? त्यावर लक्ष द्यावे.

उपअभियंता श्री.फालक :प्रेशर कमी झाल्यावर टाकीमध्ये पाहिजे तेवढे पाणी चढत नाही. ४-५ एमएलडी पाणी कमी येते.

श्री.राजू शिंदे :५० लक्ष लिटर पाणी कुठे जाते?

श्री.त्र्यंबक तुपे :जायकवाडीतून कमी पाणी का येते? तेथून शहरात पाणी कमी का येते? त्यावर उपाय करावा.

श्री.विकास एडके :उन्हाळा लागण्या अगोदर नियोजन का होत नाही?

कार्य.अभियंता :पावसाळा व हिवाळा मध्ये १३८ एमएलडी पाणी येते. आता उन्हाळा आहे ४-५ एमएलडी पाणी कमी येत आहे. पाण्याची मागणी जास्त असते. पंपाचे काम करावे लागेल. जीवन प्राधिकरणाचे अधिकारी जायकवाडी ते फारोळा पर्यत सर्व पंपाची पाहणी करतील व त्यात काय दुरूस्ती करता येईल? त्याचे सजेशन देणार आहे. ७० एचपीचा पंप बसविण्याचे प्रयोजन आहे.

श्री.नासेर सिद्दीकी :समान पाणी द्यावे. त्यांचे नियोजन करावे.

मा.महापौर :एन-५ च्या टाकीवर ४-५ एमएलडी पाणी येते. तेथे पाणी वाढविणेसाठी काय नियोजन करणार आहे?

कार्य.अभियंता :श्री.खाजा यांचेकडील चार्ज काढून तो श्री.फालक कडे दिला जाईल.

श्री.नासेर सिद्दीकी :शहरात १३५ एमएलडी पाणी येते. पाच दिवसाआड पाणी देत आहे, तर बाकी पाणी कूठे जात आहे?

श्री.फेरोज खान :सिडकोतील पाणी प्रश्नावरच सकाळपासून चर्चा चालु आहे. जुन्या शहरातही पाणी येत नाही. या भागातील लोकही कर भरणा करतात. जुन्या शहरातही पाणी मिळावे.

श्री.राजगौरव वानखेडे :पाणीपट्टी घ्यावी त्यांनाही पाणी द्यावे.

मा.महापौर :जे पाणी येते, तो एक पंप खराब आहे. त्याची क्षमता वाढवावी. १३५ एमएलडी पाण्याचा हिशोब द्यावा, सिडको एन-५ टाकीवर कमी पाणी येते. तांत्रिकदृष्ट्या जे असेल ते काम करावे. शेवटून टाकी भरण्याची योग्य ती कार्यवाही करावी. पाण्याच्या वेळा निश्चित असाव्यात. दुषित पाणी येणार नाही याची दखल घ्यावी. टाक्या भरण्याची जबाबदारी उप-अभियंत्यावर द्यावी. इल्लिगल नळावर कार्यवाही करावी. एफआयआर दाखल करावे. उत्तरानगरी भागात पाणी द्यावे. आऊटसोर्सींगवर कर्मचारी मनपाचे अभियंता असतील याची बैठक घेऊन योग्य नियोजन करावे. नळ इल्लिगल असेल त्यावर चोरीचा गुन्हा दाखल करावा. एमआयडीचे २० टक्के पाणी कमी करावे. बुस्टर ची ताबडतोब निविदा काढावी. एन-५ टाकीवर जाणारी एक्स्प्रेस लाईनवर नळ कनेक्शन देऊ नये. सातारा-देवळाईसाठी २ एमएलडी पाण्याचा प्रस्ताव आहे. एमआयडीसीकडे मागणी करावी. टँकरला जीपीएस सिस्टम लावावे. एमजीपीचे दोन अधिकारी यांना डेप्यूटेशनवर घ्यावे. पाणी प्रश्नाबाबत तक्रारी आल्या तर संबंधीत अधिकारी यांचेवर कार्यवाही केली जाईल. शहरातील संपुर्ण पाणी वितरण व्यवस्था सुरळीत करावी. नियोजन करावे.

श्री.राजगौरव वानखेडे :दोन दिवसाआड पाणी द्यावे.

श्री.फेरोज खान :समान पाणी वाटप करावे.

मा.महापौर :सिडको हडको भागात दोन दिवसाआड पाणी देण्याचे नियोजन करावे.

श्री.त्र्यंबक तुपे :मा.बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक व्हावे. नागरिकांची मागणी होती या सभेत ठराव मंजूर केला. त्यानंतर मा.पालकमंत्री यांनी मा.मुख्यमंत्री यांना भेटून र.रु.१० कोटी निधी मंजूर केला. तेथे कोणती कार्यवाही झाली? निविदा निघाल्या याची सर्व माहिती द्यावी.

कार्य.अभियंता :र.रु.०५ कोटी आलेले आहे. निविदा काढली यासाठी पीएमसी नेमली आहे. त्यांनी प्लॅन दिला तो उच्चस्तरीय कमेटीवर अमान्य केला. आता पुन्हा नवीन पीएमसीचे टेंडर कॉल करू. त्यास प्रशासकीय मान्यता मिळाली. एजन्सी अंतिम करणेसाठी स्थायी समितीकडे प्रस्ताव ठेवू.

मा.महापौर :त्यास तात्काळ मान्यता घ्यावी. तीन दिवसात पीएमसी नेमावी. सभापती कार्योत्तर मान्यता देतील.

श्री.राजू शिंदे :छत्रपती शिवाजी महाराज यांचे पुतळ्याची उंची वाढविणे बाबत काय कार्यवाही केली?

मा.महापौर :श्री.धीरज देशमुख आर्किटेक्ट आहे. कुठल्याही प्रकारचे शुल्क न घेता त्यांनी तीन प्रकारचे ड्रॉईंग वेगवेगळ्या पध्दतीचे करण्याचे व अंदाजपत्रक देणेकरीता बैठक झाली व त्यांनी संमती दिली ते दोन दिवसात येतील. यात मा.पोलीस आयुक्ताची एनओसी लागेल. त्याचे अधीन राहून निविदा ८-१० दिवसात निघेल.

**<u>चर्चा:-</u>**

श्री.त्र्यंबक तुपे :शहरातील र.रु.१५० कोटीच्या रस्त्याचे संदर्भात मी पत्र दिले होते. त्याची माहिती मिळाली नाही. शासनाकडून काँक्रीटच्या रस्त्या संदर्भात नवीन डीएसआर प्रमाणे दर आलेले आहे. ज्यावेळी या सिमेंट-काँक्रीट रस्त्याचे अंदाजपत्रक बनवले. त्यावेळी डीएसआरचे दर जास्त होते. आता ते कमी झाले. आमच्या वार्डातील काही रस्त्यांच्या कामाच्या टेंडर झालेल्या व काही रिकॉल झालेल्या संचिका मा.आयुक्त यांनी परत पाठविल्या आहेत. त्यांचे असे म्हणणे होते की, नवीन दरानुसार अंदाजपत्रक करावे. यात मनपाचा फायदा होईल. र.रु.१५० कोटीच्या कामाचे टेंडर झाल्यानंतर हे प्रकरण आता मा.कोर्टात वादग्रस्त आहे. या सर्व कामांची आजही वर्क ऑर्डर झालेली नाही. मा.कोर्टात जरी मॅटर चालू असले तरी महानगरपालिकेचे नुकसान होणार नाही. जे की, १५-२० टक्के डीएसआरच्या माध्यमातून दर कमी झाले. जो ही पैसा शिल्लक राहील त्यात उर्वरीत रस्ते करता येतील. डीएसआरच्या नवीन दराबाबत मनपाची भुमिका मा.कोर्टात मांडावी की, शासनाचे परीपत्रक आहे शासनाने डीएसआरचे दर कमी केले आहे. नवीन दरानुसार फायदा होणार असेल तर मा.कोर्टात महापालिकेच्या वतीने चांगले वकील लावून बाजू मांडावी. जो ही शासनाचा निधी असेल, तरी तो नागरिकांचा पैसा आहे. प्रशासनाची यात काय भुमिका आहे? स्पष्ट करावी.

कार्य.अभि.श्री.अली :रस्त्याचे कामाचे बी-१,२,३,४ मध्ये टेंडर काढले व दोन टेंडर डिफर पेमेंन्टवर आहे. हे दर डीएसआर प्रमाणे ई-टेंडर पध्दतीने रेट आऊट केले आहे. त्यामध्ये स्पर्धा झाली. त्यावेळचे डीएसआर प्रमाणे रेट भरलेले आहे. त्यानंतर एजन्सी फायनल झाली नाही. वर्क ऑर्डर दिली नाही. त्यात बरेच ठेकेदार मा.कोर्टात गेले व आता सुनावणीची तारीख २४ आहे. आता नवीन एसएसआर रेट आले आहे. ते अगोदरचे जे डीएसआरचे रेट होते त्यापेक्षा कमी आहे. १५-१८ टक्के

रेट कमी झाले आहे. सर्व प्रक्रिया आता मा.कोर्टात आहे. म्हणून त्यावर निर्णय घेतलेला नाही.

श्री.त्र्यंबक तुपे :मा.कोर्टात मॅटर आहे असे असले, तरी आता पुर्वीच्या दरात व आताच्या नवीन दरात मोठा फरक येतो. मनपाने महापालिकेची भुमिका कोर्टात मांडावी की, शासनाच्या निर्णयानुसार दर कमी झाले. २० टक्के पैसे जे की र.रु.२० कोटी वाचतील त्या रक्कमेत इतर कामे करता येतील. एजन्सी फायनल करायची असेल तरी त्यात मा.आयुक्त यांना सर्व अधिकार दिलेले असतात. निकाल एजन्सीच्या बाजूने लागला तर त्याप्रमाणे काम करणार काय? दर कमी झाले त्यानुसार काम केले तर र.रु.२० ते २५ कोटीचा फायदा होईल. महापालिकेची मा.कोर्टात बाजू मांडण्यासाठी विधी विभागाच्या मार्फत चांगले वकील लावून कारवाई करावी. शहरातील नागरीकांचे हित लक्षात घ्यावे.

मा.महापौर :या संदर्भात पुर्वीचे डीएसआरचे दर व आताचे दर याचा तुलनात्मक तक्ता तयार करून तो मा.आयुक्त यांना दाखवून त्याची टिप्पणी तयार करून आमच्या कडे द्यावी. त्यानंतर काय करता येईल? ते बघू.

श्री.त्र्यंबक तुपे :तक्ता वगैरे तयार करतील, परंतु त्यापुर्वी मा.कोर्टात अपील वगैरे करण्याची तयारी करण्याचे आदेशीत करावे. जर २४ तारखेला निकाल दिला तर परत काही करता येणार नाही. आज रोजी त्याबद्दल मनपाचे तेथे काहीच म्हणणे नाही.

मा.महापौर :पहिले तुलनात्मक तक्ता द्यावा. त्यानंतर मनपाचे जे म्हणणे असेल तेही तेथे त्या तारखेला मांडू.

श्री.त्र्यंबक तुपे :प्रशासन म्हणून सर्वस्वी जबाबदारी श्री.सिंकदर अली यांची असेल, माझे म्हणणे मी मांडले. प्रशासनाचे हित लक्षात घेणे न घेणे हे अधिकारी यांचे काम आहे. शेवटी या महापालिकेचा जनतेचा फायदा होत असेल तर ती कारवाई केली पाहिजे. फक्त मा.कोर्टात मॅटर चालू आहे. निर्णय येऊ द्यावा, असे चालत असेल तर ही जबाबदारी अधिकारी यांचेवर निश्चित होईल. अधिकारी अडचणीत येणार नाही, त्या पध्दतीने यात त्यांनी भुमिका घ्यावी.

श्रीमती माधुरी देशमुख :महिला शौचालयात अश्लिल फोटो व लिहिले गेले होते पेपरला बातमी आली. आता महिला शौचालयात जाण्यास घाबरतात. याची जबाबदारी कोणाची आहे? सिल्लेखाना भागात गोवंश हत्या सुरू आहे. पोलीसांचे पत्र मनपास आलेले आहे. तेथील प्रकार का थांबवित नाही?

मा.महापौर :याबाबत कार्यवाही करावी. श्री.नाईकवाडी मुख्य पशुधन अधिकारी सभागृहात हजर नाही. त्यांना नोटीस देऊन दंडात्मक कार्यवाही करावी.

श्री.सचिन खैरे :गुलमंडी, रंगारगल्ली व दिवाण देवडी भागात रस्त्याचे पॅचवर्क करावे.

श्रीमती रेशमा कुरेशी :भगवान शिक्षण प्रसारक मंडळाच्या इमारतीस कम्प्लीशन दिले. त्या बाबत खुलासा करणार होते?

श्री.दिलीप थोरात :या संदर्भात मा.उच्च न्यायालयात स.सदस्य यांनी याचिका दाखल केली. असताना त्यावर चर्चा करता येते का?

उपअभि.श्री.कुलकर्णी :या प्रकरणी जेवढ्या क्षेत्रामध्ये परवानगी दिली तेवढ्याच क्षेत्राचे भागश: भोगवटा प्रमाणपत्र राज्य शासनाच्या निर्देशानुसार दिलेले आहे. जे अतिरिक्त बांधकाम केले आहे, त्या संबंधी प्रिमीयम प्रकरणी जी दंडाची कार्यवाही

करावयाची आहे. नोटीस दिनांक ०६.०२.२०१८ दिली आहे. जे अतिरिक्त बांधकाम केलेले आहे.

मा.महापौर :हे प्रकरण न्यायालयात आहे का?

श्री.फेरोज खान :मा.कोर्टात प्रकरण चालू होते तर, पार्ट कम्प्लीशन देता येते का?

विधी सल्लागार :या संबंधी दोन प्रकरण चालू आहे. पीआय क्रमांक २७/१७ नुसार स.सदस्या श्रीमती रेशमा कुरेशी यांचेतर्फे दाखल आहे. दुसरी याचिका १४८१३/१७ यामध्ये त्यांनी इन्ट्रमेशन दाखल केले आहे.

श्री.दिलीप थोरात :हेच सांगतो की, सदस्य यांनीच याचिका दाखल केली आहे. मा.न्यायालयाचा जो निर्णय येईल तो सर्वांना बंधनकारक राहिल.

श्री.फेरोज खान :जे पार्ट कम्प्लीशन दिले ते रद्द करावे. र.रु.१४ कोटीचा वसुलीचा विषय आहे.

श्री.विकास एडके :कम्प्लीशन दिले ते रद्द करावे.

श्री.दिलीप थोरात :भगवान शिक्षण प्रसारक मंडळाने मा.कोर्टात ॲफिडेव्हिट दिले की, मा.कोर्ट जे आदेश देईल ती रक्कम भरण्यास तयार आहे. प्रकरण दाखल केले, स्थगिती दिली आहे. मा.कोर्टात मॅटर चालू असतांना त्यावर चर्चा करता येते का?

श्री.राजू शिंदे :मा.कोर्टात प्रकरण चालू असेल तर चर्चा करता येते का ?

श्रीमती रेशमा कुरैशी :पार्ट कम्प्लीशन रद्द करावे नसता मी डायस समोर बसणार आहे.

श्री.राजू शिंदे :पार्ट कम्प्लीशन राज्य शासनाच्या निर्देशानुसार दिले की मनपाने दिले? जर प्रकरण न्यायालयात असेल तर चर्चा करता येते का? मा.न्यायालयाचा अवमान होऊ नये. याची दखल घ्यावी.

मा.महापौर :किती कोटी रक्कमेची वसुलीची नोटीस आहे, त्याला चॅलेन्ज केले का?

या वेळी स.सदस्या श्रीमती रेशमा कुरैशी डायस समोर बसतात.

मा.महापौर :डायस समोर आपण बसू नये. जागेवर उभे राहून शांततेत आपले मत मांडावे.

विधी सल्लागार :संबंधीतांना सन-२००९ साली बांधकाम परवानगी दिली होती. त्यापुरतेच कम्प्लीशन शासन निर्णयानुसार दिले. आठ दिवसाच्या आत कार्यवाही करण्याचे आदेशीत केले होते. शासनाकडे वेगळी सुनावणी चालू होती.

श्री.दिलीप थोरात :शासनाने सुनावणी घेतली. शासनाला योग्य वाटले म्हणून कम्प्लीशन देणे बाबत आदेशीत केले. त्यानुसार परवानगी नुसार कम्प्लीशन दिले आहे.

विधी सल्लागार :मा.न्यायालयाकडून यात ऑर्डर झालेली नाही.

मा.महापौर :मा.उच्च न्यायालयात स.सदस्या यांनी पिटीशन दाखल केले. मा.कोर्टाचा निर्णय येत नाही. तोपर्यंत या बाबत निर्णय देता येत नाही, एकतर ते प्रकरण मागे घेतले तर योग्य न्याय देता येईल. एकाच वेळी दोन्हीकडे न्याय मागता येणार नाही. मा.कोर्टापेक्षा हे सभागृह मोठे नाही.

विधी सल्लागार :मा.न्यायालयात वाद चालू असतांना निर्णय देणे योग्य होणार नाही.

श्रीमती रेशमा कुरैशी :प्रकरण मा.कोर्टात आहे तर पार्ट कम्प्लीशन कसे दिले?

मा.महापौर :या प्रकरणात असलेले मनपाचे वकील, विधी सल्लागार, सहाय्यक संचालक नगर रचना, नगर रचनाकार, तसेच अतिरिक्त आयुक्त यांनी चौकशी करावी माहिती घ्यावी. तीन दिवसात अहवाल माझेकडे सादर करावा, मा.कोर्टात प्रकरण असतांना निर्णय देता येत असेल तर तो देऊ.

श्री.राजू शिंदे :चर्चा केली तर कन्टेम्प्ट होऊ शकतो.

विधी सल्लागार :शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार कार्यवाही केली. शासन सर्वोच्च प्राधिकरण आहे. शिवाय मा.कोर्टात प्रकरण चालू आहे. त्यावर निर्णय घेणे योग्य नाही.

श्री.दिलीप थोरात :ज्यांचे त्या कम्प्लीशनवर ऑब्जेक्शन आहे, त्यांनी शासनाकडे रद्द करणे बाबत अपील करावे.

श्री.गंगाधर ढगे :जुना बाजार ते मनपा या रस्त्यावर तीन ठिकाणी कचऱ्याचे ढिग आहेत. वार्ड अधिकारी यांना सुचना केली. श्री.पैठणे सांगतात की, कर्मचारी ऐकत नाही.

वार्ड अधिकारी-१ :या प्रभागात १४ वार्ड येतात, दररोज येथून ४० टन कचरा निर्माण होतो. आतापर्यत २५०० मॅ.टन कचऱ्याची विल्हेवाट लावली आहे.

श्री.विकास एडके :सध्या कचरा पडलेला आहे. दुर्गधी सुटली आहे. तो का उचलत नाही? किती दिवसात कचरा विषय संपेल सांगावे?

मा.महापौर :कचरा ओला झाला, तो प्रॉब्लेम आहे. काही ठिकाणी आग लावली जात आहे.

वार्ड अधिकारी-१ :१८० मॅ.टन कचरा रस्त्यावर आहे. घाटीच्या ४० टन कचऱ्यावर नाशिक एजन्सीच्या मार्फत प्रकिया केली. तेथे खत निर्माण होईल.

श्री.फेरोज खान :प्रभाग १ अंतर्गत लिटल स्टार स्कूल जवळ ७-८ टन कचरा एक महिन्यापासून जमा आहे. बाजूला हॉस्पीटल आहे, कार्यवाही करीत नाही. फोन घेत नाही. कब्रस्तानच्या बाजूला तसेच, मा.आमदार यांचे ऑफिसच्या बाजूला कचरा पडलेला आहे.

मा.महापौर :कम्पोस्ट पीट तयार करावे. प्रकिया करावी. आताच सुचना केल्यानुसार तेथील कचरा उचलावा. वेअर हॉऊसच्या इमारती भाड्याने घेणार होतो. त्याचे काय झाले? लिटल फ्लावर स्कूल, मेडीकल कॉलेजच्या भिंतीच्या बाजूला कचरा आहे. रस्त्यावर पडलेल्या कचऱ्यावर सेग्रीगेशन करावे. ओला कचरा कम्पोस्ट पीट वर घेऊन जावा. श्री.ढगे यांनी सांगितल्यानुसार तेथील कचरा उचलावा. उद्याच कचरा उचलावा.

प्रभाग अधिकारी-१ :त्यासाठी कर्मचारी कामाला लावले आहे. लवकरात लवकर कार्यवाही केली जाईल.

श्रीमती रेशमा कुरैशी :शनि मंदीराजवळ कचरा पडलेला आहे.

प्रभाग अधिकारी-२ :तेथील ३० टक्के कचरा राहिला असेल. दुसऱ्या वार्डात मोठी जागा आहे. तेथे कम्पोस्टींग पीट व शेड करण्यासाठी कार्यवाही चालू आहे. गांधीनगर भागात एका ठिकाणी जागा आहे. तेथेही प्रोसेस चालू आहे. प्रभाग २ मध्ये कुठेही मोठी जागा नाही. त्यामूळे कचरा कोंडी झाली, कचरा विल्हेवाट लावणेसाठी प्रयत्न करीत आहे. संजयनगर भागात जागा नाही. शहागंज भागात जागा आहे, तेथे कंम्पोस्टींग पीट सुरू केले शेडचे काम चालू आहे.

श्रीमती सायरा बानो :शहागंज भाजीमंडई येथे मोठा कचरा पडलेला आहे. फिश मार्केट येथे मोठे शेड केले तरी, कचरा जास्त असल्याने बाहेर येत आहे. पावसामूळे त्या कचऱ्याची दुर्गंधी येत होती. सेग्रीगेशन होत नाही.

श्री.फेरोज खान :शहागंज भाजीमंडई येथील कचरा एकाच ठिकाणी जमा करीत आहे. नागरिक आमच्याकडे समस्या घेऊन येतात.

मा.महापौर :उद्या सकाळी मी ६.३० वाजता भाजीमंडी भागात येतो. वार्ड अधिकारी यांनी तेथे यावे. तेथील कचरा उचलावा.

| | |
|---|---|
| श्रीमती किर्ती शिंदे | :माझे वार्डात ओला-सुका कचरा वेगळा होतो. परंतु, आता कर्मचारी संख्या कमी झाली आहे. कर्मचारी द्यावे. सॅनेटरी नॅपकीन, वेडींग मशीन बाबत कार्यवाही करावी. |
| मा.महापौर | :आवश्यक कर्मचारी या वार्डासाठी द्यावे. तसेच वार्ड अधिकारी यांना र.रु.३ लक्ष पर्यंत खर्चाचे अधिकार दिले, त्याचा वापर करावा. सॅनेटरी नॅपकीन करीता वेडींग मशीन ताबडतोब मंजूर करावे. |
| श्री.रामेश्वर भादवे | :पैठणगेट भागात ५-६ ट्रक कचरा साचला तो उचलावा. सुका कचरा गोण्या भरल्या त्याची विल्हेवाट लागत नाही. |
| श्री.फेरोज खान | :ड्रेनेज साठी दोन लेबर द्यावे. मी पत्रही दिले आहे. |
| मा.महापौर | :दोन लेबर ताबडतोब द्यावे. |
| प्रभाग अधिकारी-३ | :या प्रभाग अंतर्गत एकूण १३ वार्ड आहे. तर ५०-५५ टन कचरा आवक होतो. सेन्ट्रल नाका येथे कचरा जमा केला, तेथे नाशिक एजन्सीमार्फत प्रक्रिया होत आहे. |
| श्री.अब्दुल नाईकवाडी | :तेथे दुर्गंधी सुटली आहे. ओला कचरा डांबुन त्यांचे खत तयार केले जाते, आता जागा नाही. केमिकल मारून पावडर टाकले आहे. तेथे प्रक्रिया करावी. ओला-सुका कचरा वेगळा करणेसाठी लेबर लावावेत. नारेगाव सारखे तेथे कचरा डम्पिग करीत आहे. |
| मा.महापौर | :ओला-सुका कचरा वेगळा करावा. फवारणी करावी. कंम्पोस्टींग पीट करावे. सकाळी ५.३० वाजता मी स्वत: तेथे येतो, वार्ड अधिकारी यांनी हजर रहावे. |
| प्रभाग अधिकारी-४ | :या प्रभागात १३ वार्ड येतात. घरोघरी जाऊन कचरा जमा होतो. सेग्रीगेशनचे काम चालू आहे ८ ठिकाणी पीट तयार करण्यात येत आहे. २८ टन ओला व ६ टन सुका व मध्ये प्रक्रिया चालू आहे. |
| कक्ष प्रमुख-घनकचरा | :ड्रायवेस्ट कचरा दोन ट्रक मागच्या वेळेस अंबुजा सिमेंटला पाठविला, त्यांची कंपनी आता ती मेंन्टेनन्समध्ये गेल्याने डिमांड बंद झाली आहे. उद्या दहा टन कचरा देणेसाठी प्रयत्न करतो आहे. |
| मा.महापौर | :ड्रायवेस्ट कचरा देणेसाठी पेपरला जाहिर प्रगटन द्यावे कार्यवाही करावी. |
| श्रीमती सिमा खरात | :लक्ष्मी तेल भांडारच्या बाजुला सिडकोची मोकळी जागा आहे. तेथे कुणीतरी कचरा पेटवून दिला. अशा ठिकाणचा कचराही वेळीच उचलावा. |
| प्रभाग अधिकारी -४ | :लगेच पाहणी करून कचरा उचलला जाईल. |
| प्रभाग अधिकारी-५ | :झोन क्र.५ मध्ये १४ वार्ड येतात. सेग्रीगेशन सुरू आहे, ओल्या कचऱ्यावर कंम्पोस्टींग केले जाते, सुका कचरा भरून ठेवला आहे. दररोज ५० टन कचरा निघतो. ओला कचरा २५ टन, सुका कचरा २० टन व इतर डम्पिंगवर कचरा जमा होतो. |
| श्री.अब्दुल नाईकवाडी | :मरीमाता मंदीर जवळ पाण्याची लाईन तेथे कचरा टाकतात. मनपाचे कर्मचारी आग लावतात. मेस वाले कचरा टाकतात. कोण कचरा टाकतात? त्याचे फोटो घेऊन कार्यवाही करावी. आमच्या स्वेच्छानिधीतून सीसीटीव्ही कॅमेरे, वॉल पेंटीग व बोर्ड लावण्यासाठी कार्यवाही व्हावी. |
| मा.महापौर | :या वर्षीच्या स्वेच्छानिधीतून वरील प्रमाणे काम करण्यात यावे. आताच सुचना केल्याप्रमाणे तेथील कचरा उचलण्यात यावा. श्री.राठी यांचेकडे छोटे-छोटे मशीन कचरा विल्हेवाटीसाठी प्रक्रिया करता येते, असे मशीन यातून घेता |

येतील. असे सर्व प्रस्ताव मान्य करण्यात यावे. शासनाचा डीपीआर मंजूर केला, त्यानुसार कार्यवाही करावी.

श्री.राजू शिंदे :झोन क्र.५ मध्ये चांगले काम कचरा बाबत चालू आहे. माझे वार्डात ओला सुका कचरा वेगळा करतो आहे. शेड करावे. ते होत नाही. आमच्या निधीतून करावे. सर्वांनी यासाठी मदत करावी. मशीन अद्याप खरेदी केले नाही. गरवारे स्टेडीयम जवळ तात्पुरते शेड उभारून काम चालू केले नंतर असे समजले की, कायम स्वरूपी तेथे शेड करीत आहे. असे होऊ नये. तात्पुरते स्वरूपाचे रहावे. १० खड्डे घेतले ते आता पावसाळा सुरु होण्या अगोदर बंद करावे लागेल. र.रु.५,७ लक्षचे मशीन खरेदी करावे. वार्डातील प्रश्न सुटेल. डीपीआर चुकीचा केला आहे. २७ मशीन बसविणार आहे. ते बसवावे नंतर इतर ठिकाणी विचार करावा. वार्डातच लेआऊट भाग असेल तेथे छोट्या मशीन बसून ४०-५० टक्के अडचण कचऱ्याची दुर होईल. शहराचा प्रॉब्लेम शहरात सोडविता येईल. श्रीमती खरपे मॅडम चांगले काम करीत आहेत त्यांचे अभिनंदन करावे.

श्री.शिवाजी दांडगे :सिडको-हडको भागात झाडे जास्त असल्याचे सुका कचरा जास्त निघतो. तो कचरा सेग्रीगेशन करणेसाठी जास्तीचे लेबर द्यावे. बचत गटामार्फत कर्मचारी द्यावे.

मा.महापौर :मा.आयुक्तांनी वार्ड अधिकारी यांना अधिकार दिले आहे. त्यानुसार कार्यवाही करावी. श्रीमती खरपे मॅडम चांगले काम करीत आहेत त्यांचे अभिनंदन करावे.

प्रभाग अधिकारी-६ :या प्रभागात १४ वार्ड येतात. या प्रभागात ५८ टन कचरा निघतो. ओला कचरा ३४ टन, सुका कचरा ११ टन, मिक्स कचरा १३ टन असा असतो. कचऱ्याची विल्हेवाट व्यवस्थित लावली जात आहे. रस्त्यातील कचराचे सेग्रीगेशन केले जाईल. सेग्रीगेशन १० वार्डात चालू आहे.

श्री.भाऊसाहेब जगताप :झोन क्र.६ मध्ये अपेक्षित तेवढी जागा नाही. बाजूच्या वार्डात ओल्या कचऱ्यासाठी पीट बांधावे. महानगरपालिकेच्या मालकीच्या ओपन जागा आहेत. तेथे पीट करावे आता पावसाळा येईल. ओला कचऱ्याची दुर्गंधी पसरेल, वाहने द्यावी. कचरा उचलण्यास उशीर होतो, म्हणून काही लोक नाल्यामध्ये कचरा टाकतात. कचरावर आमच्या वार्डात पावडर टाकले जात नाही.

श्रीमती ज्योती नाडे :वार्डात मनपाच्या दवाखान्याजवळ कचरा पडलेला आहे. तो उचलावा.

प्रभाग अधिकारी-७ :या भागात १५-१६ टन कचरा शिल्लक आहे. रस्त्यावर २० टन कचरा असेल, तो सेग्रीगेट करतो आणि त्याची विल्हेवाट लावतो आहे. कंम्पोस्टींग पिट साठी कार्यवाही करतो आहे. काही ठिकाणी ते करण्यास विरोध होतो.

श्रीमती सिमा चक्रनारायण:सायकल घंटागाडी माझे वार्डात द्यावी.

मा.महापौर :सर्व हॉटेल व मंगल कार्यालय यांना नोटीस द्यावी की, त्यांनी त्यांचेकडे निर्माण होणा-या कचऱ्याची विल्हेवाट लावावी. तशी पेपरला जाहीर नोटीस देऊन कार्यवाही करावी. दर्गा जवळ चौपाटीवाले यांना नोटीस द्यावी आणि कार्यवाही करावी.

प्रभाग अधिकारी-९ :या प्रभागात १३ वार्ड आहे, २ वार्डात ६० टक्के वर्गीकरण करण्यात येते. ३३ रिक्षा आहे. सध्या ९ टन कचरा ३९० गाड्यांमध्ये विक्री करणे शक्य नसल्यामूळे भरलेला आहे. एजन्सीची कंपनीची मागणी असेल तर तेथे तो कचरा पाठविता येईल.

श्री.त्र्यंबक तुपे :पावसाळा सुरू होणार आहे. कचऱ्याची विल्हेवाट कशी लावणार आहे? ते सांगावे?

मा.महापौर :जो कचरा पडलेला आहे, त्यासाठी वेचक लावून तो सेग्रीगेशन करतो आहे. ओला कचऱ्याचे पीट तयार करीत आहे. सुका कचरा गोडाऊन भाड्याने घेतो. आहे हा विषय आता संपवावा.

प्रभाग अधिकारी-९ :३९० बॅगमध्ये कचरा भरून ठेवलेला आहे. तो कोणी घेत नाही, तोपर्यत पडलेला राहिल. शॉर्टींग सेन्टर रमानगरमध्ये तयार केले. तेथे बांधकाम होत आहे.

मा.महापौर :ओला-सुका कचरा वेगळा करावा. ओला कचरा कंम्पोस्टींग करावे, सुका कचरा साठवावा. गार्डन वॉक मधील कचरा उचलावा. वेअर हाऊसचे गोडाऊन रिकामे आहे, ते घेणे बाबत मा.आयुक्तांना बोललो होतो. त्या ठिकाणी तो सुका कचरा टाकावा.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर:आमच्या वार्डात ओपन स्पेसच्या जागेवर दुसऱ्या वार्डातील कचरा आणून टाकत आहे.

मा.महापौर :अशा वर दंडात्मक कार्यवाही करावी. नागरिकांची सवय बदलायला पाहिजे. नागरीकांचे सहकार्य ही अपेक्षित आहे. रसवंती वाले यांचाही कचरा त्यांनी उचलण्या बाबत कार्यवाही करावी.

प्रभाग अधिकारी-८ :या प्रभागात ९ वार्ड येतात. एकूण ३४ टन कचरा निघतो. २७ टन कचरा ओला, ७ टन कचरा सुका आहे. कांचनवाडी येथे पीट तयार केले आहे.

मा.महापौर :सर्व प्रभाग अधिकारी यांनी कचऱ्याची व्यवस्थित विल्हेवाट लावावी. पीट कंम्पोस्टींग करावे. ओला-सुका कचरा वेगळा व्हावा, या दृष्टीने कार्यवाही करावी.

**<u>विषय क्रमांक ४०६:-</u>**

मंगळवार दिनांक ३०.०१.२०१८ रोजीच्या (दि.०८.०१.२०१८ रोजीची तहकुब सभा क.प.क्र.०४) सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मंगळवार दिनांक ३०.०१.२०१८ रोजीच्या (दि.०८.०१.२०१८ रोजीची तहकुब सभा क.प.क्र.०४) सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत कायम करण्यास मंजुरी देण्यात येते.

**<u>विषय क्रमांक ४०७:-</u>** **(शहर अभियंता)**

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक स्वमअ-२०१५/ प्र.क्र.२४९/नवि-३४,दिनांक १९.११.२०१५ नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा घेणे.

**<u>अहवाल:-</u>**

अहवाल सादर करण्यात येतो की, देशातील सर्व शहरे हागंदारी मुक्त करुन शहरातील घनकचऱ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी केंद्र शासनाने स्वच्छ भारत अभियान (नागरी) दिनांक ०२ ऑक्टोबर २०१४ पासुन राबविण्यास सुरुवात केली आहे. केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यामध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) ची अंमलबजावणी सुरु केली आहे. त्यानुसार औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रामध्ये अंतर्गत जे नागरिक उघड्यावर शौचास जाण्याची पध्दत वापरतात व ज्या नागरिकांकडे

वैयक्तिक शौचालय नाही. फक्त अशाच नागरिकांना सदर योजनेतुन वैयक्तिक शौचालयाच्या बांधकामासाठी शासनामार्फत र.रु.१२०००/- प्रति शौचालय एवढे अनुदान उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. सदर अनुदानामध्ये केंद्र शासनाचा हिस्सा रक्कम रु. ४०००/- व राज्य शासनाचा हिस्सा रक्कम रु.८०००/- इतका आहे. या संदर्भाने सदरील अभियानाअंतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे कार्यवाही करण्यात येत असून आतापर्यत झालेल्या कामाचा प्रगती अहवाल खालीलप्रमाणे आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत वैयक्तीक शौचालय बांधकामासाठी अनुदानास पात्र लाभार्थ्याची निवड करण्याची कार्यवाही सुरु असून आज पर्यत **७४९७** लाभार्थ्याची निवड करण्यात आलेली आहे . त्यापैकी सुमारे **७२६३** लाभार्थ्यास अनुदानाचा पहिला हप्ता रक्कम रु.६०००/- प्रति लाभार्थी इतका त्यांच्या बॅकेच्या खात्यामध्ये RTGS द्वारे जमा करण्यात आलेला आहे. उर्वरीत **२३४** पात्र लाभार्थी यांना पहिल्या हफ्त्याची रक्क्म RTGS करणेची कार्यवाही सुरु आहे. आतापर्यत लाभार्थ्यास पहिल्या हप्त्याच्या अनुदाना पोटी एकुण रक्कम रु. **४,३५,७८,०००/-** इतकी वितरीत करण्यात आलेली आहे.

तसेच या व्यतिरीक्त क्रेडाई औरंगाबाद या बांधकाम व्यावसायिक संस्थेस वैयक्तीक शौचालयाचे बांधकाम करण्याचे काम देण्यात आलेले असून आतापर्यत त्यांचे बॅकेत खात्यावर एकूण **१२९३** लाभार्थ्याचे पहिल्या हप्त्याचे अनुदान रु.६०००/- प्रति लाभार्थी प्रमाणेएकुण र.रु.**७७,५८,०००/-** इतके RTGS करण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

तसेच आतापर्यत वैयक्तीक शौचालयाच्या बांधकामासाठी अनुदानाचा पहिला हप्ता (वैयक्तीक लाभार्थी व क्रेडाई संस्था मिळून) एकूण ८५५६ इतक्या लाभार्थी संख्येस RTGS करण्यात आले असून एकुण पहिल्या हप्त्याचे अनुदाना पोटी र.रु. ५,१३,३६,०००/- इतकी रक्कम वितरीत करण्यात आली आहे.

तसेच आजपर्यत एकुण **६४७७** लाभार्थ्यानी शौचालय बांधकाम पूर्ण केलेले असून **१०६१** लाभार्थ्याचे शौचालयाचे बांधकाम सुरु आहे तसेच **१०१८** लाभार्थ्यामार्फत शौचालयाचे बांधकाम सुरु करुन घेण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. बांधकाम पूर्ण केलेल्या **४७५९** लाभार्थ्यास अनुदानाचा दुसरा हप्ता रक्कम रु.६०००/- प्रति लाभार्थी इतका त्यांच्या बॅकेच्या खात्यामध्ये RTGS द्वारे जमा करण्यात आलेला आहे. आतापर्यत एकुण **४७५९** लाभार्थ्यास दुस-या हप्त्याच्या अनुदाना पोटी एकुण रक्कम रु. **२,८५,५४,००० /-** इतकी वितरीत करण्यात आलेली आहे . पहिल्या व दुसऱ्या हप्त्याच्या अनुदाना पोटी एकूण रक्कम रु .**७,९८,९०,०००/-** इतकी वितरीत करण्यात आलेली आहे .

आजपर्यत एकूण **९२९०** लाभार्थ्याचे फॉर्म तसेच शौचालय बांधकाम पूर्ण झालेल्या **६४७७** लाभार्थ्या पैकी **६०९६** लाभार्थ्याच्या शौचालय बांधकामाचे फोटो शासनाच्या वेबसाईटवर अपलोड करण्यात आलेले आहेत. उर्वरित लाभार्थ्याच्या शौचालय बांधकामाचे फोटो व फॉर्म अपलोड करण्याची कार्यवाही सुरु आहे.

तसेच शहरातील ज्या भागात open defecation चे प्रमाण जास्त आढळून आले आहे. अशा भागात सर्व्हेक्षण करुन चार स्थळे अनुक्रमे १) आंबेडकरनगर २) मिसारवाडी ३) हर्षनगर फाजलपुरा व ४) शताब्दीनगर या भागात सार्वजनिक वापरासाठी शौचालय बांधणे व केवळ महिलाकरीता एकुण सहा ठिकाणी शौचालय बांधकाम करण्यासाठी महानगरपालिकेने रक्कम रु. १३५.०० लक्षच्या निविदा काढण्यात आलेल्या आहेत. तसेच आणखी चार ठिकाणी Pay & Use तत्वावर सुलभ शौचालय बांधण्यात येणार आहेत. अशी एकुण १४ पब्लिक टॉयलेटची कामे हाती घेण्यात येणार आहेत. या अंतर्गत एकूण १०० बैठकीचे (seats) नियोजन केलेले आहे. कार्यादेश झाल्यानंतर कामे हाती घेण्यात येतील. शहरात विविध गर्दीच्या ठिकाणी अद्यावत अशी Pay & Use शौचालय बांधण्याचा उपक्रम मनपाने हाती घेतला आहे. या उपक्रमाअंतर्गत शहरात आतापर्यत विविध

ठिकाणी मनपा फंडामधून १५ व BOT तत्वावर ०५ अशी एकूण २० Pay & Use सार्वजनिक शौचालय बांधण्यात आलेली आहे. त्याव्यतिरिक्त शहरामध्ये विविध वार्डाअंतर्गत २० सार्वजनिक शौचालय वापरात आहे.

- शहरामध्ये विविध ठिकाणी सार्वजनिक शौचालय / वैयक्तीक शौचालय बांधणेसाठी मनपाने शहरातील उद्योजक / बांधकाम व्यावसायीक व सामाजीक संस्था यांना सामाजीक बांधीलकी (CSR) मधून बांधणे बाबत आवाहन करण्यात आले असून त्यामधून आर्थिक निधी उभारण्यात येत आहे. त्यानुसार आतापर्यत

१) Lupin Ltd. या कंपनीने औरंगपुरा येथील एक सार्वजनिक शौचालयाची दुरुस्ती करणे
२) Lions club of Aurangabad central यांनी मुकूंदवाडी भाजी मंडई, आनंद गाडे चौक व कबिर नगर येथील दोन असे एकूण चार सार्वजनिक शौचालयाची दुरुस्ती
३) Garware polyester Ltd. गरवारे स्टेडीयम येथे स्चच्छतागृहाची दुरुस्ती करणे .
४) Lions club of (Icon) Aurangabad यांनी महिलांसाठी एक E-Toilet राजाबाजार येथे उभारण्यात आलेले आहे.

- तसेच शहरातील मा.खासदार/मा.आमदार यांना त्यांच्या निधीमधून सार्वजनिक शौचालय बांधणेसाठी निधी उपलब्ध करुन देणे बाबत अवाहन केले असून त्यामधून आर्थिक निधी उपलब्ध करण्यात येत आहे त्यानुषंगाने

१) मा.खासदार श्री.राजकुमार धुत यांनी RTO कार्यालय येथे एक व मुकूंदवाडी ग्रीन बेल्ट येथे एक असे एकूण दोन नविन सार्वजनिक शौचालय
२) मा.आमदार श्री.अतुल सावे यांनी दोन सार्वजनिक शौचालय दुरुस्ती करण्यास अनुमती दर्शविलेली आहे.

श्री.गोकुळसिंग मलके :जवळपास ४०-५० शौचालयामध्ये भांडे बसविले नाही. लोक बाहेर शौचालयास जातात.

कार्य.अभियंता-ड्रेनेज :शासनाकडे र.रु.३ कोटीची मागणी ४ महिण्यापासून करतो आहे. शासनाकडे विनंती केली. निधी वितरीत करू असे सांगितले, त्यानंतर कार्यवाही होईल.

मा.महापौर :शासनाकडून येणारा निधीची आठवडा भर वाट पाहवी, नसता तात्पुरता मनपाचे बजेट मधून खर्च करावे. शासनाकडून आल्यानंतर त्यातून वळती करावे.

श्रीमती सुरेखा सानप :ब्रिजवाडी भागातही शौचालयास भांडे बसविले नाही. ६०-७० लोकांना दुसरा हप्ताची रक्कम दिली नाही. सार्वजनिक शौचालय दुरूस्त होत नाही.

मा.महापौर :हा विषय मंजूर. ज्या सुचना केल्या त्यानुसार कार्यवाही करावी.

**ठराव:-**

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक स्वमअ-२०१५/ प्र.क्र.२४९/नवि-३४, दिनांक १९.११.२०१५ नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीच्या आढाव्यास मंजुरी देण्यात येते.

**विषय क्रमांक ४०८:-** **(शहर अभियंता)**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, श्री.राजु शिंदे, स.सदस्य यांच्या विनंती वरून वॉर्ड क्र.३८, मसनतपुर येथे मनपाच्या शाळेच्या आवारातील पूर्व बाजुच्या जुन्या इमारतीची पाहणी केली असता सदरची इमारत ना दुरुस्त झालेली व मोडकळीस झाल्याचे आढळून आले असून या इमारतीला ठिक-ठिकाणी तडे गेले आहेत येथील नागरीकांच्या माहिति नुसार सदर इमारत साधारणत: सन १९८५ ते सन १९९० या काळात बांधलेली असून ही इमारत लोडबेरींग स्ट्रक्चर

मध्ये बांधलेली आहे. तसेच सदर इमारतीचे आर.सी.सी.छत नादुरुस्त झाले असून ठिक-ठिकाणी स्लॅबचे लोखंड उघडे पडले आहे. या कारणाने सदर नादुरुस्त इमारतीचा वापर अपघात होऊ नये यासाठी थांबविण्यात आला आहे. सद्यस्थितीत याच मनपा शाळेच्या आवारात पश्चिम बाजुने असलेल्या आर.सी.सी. इमारतीच्या पहिल्या मजल्यावर ५ वर्ग खोल्या विद्यार्थ्यांसाठी बांधण्यात येत आहेत. त्यामुळे व सदर इमारतीचा जुना झालेला नादुरुस्त भाग ज्यामध्ये ३ वर्ग खोल्या आहेत. त्याचे पाडकाम करणे आवश्यक आहे.

करीता, वॉर्ड क्र.३८, मसनतपूर येथील महानगरपालिकेच्या पुर्व बाजूच्या जुन्या इमारतीचा भाग पाडण्यात यावा.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३८, मसनतपूर येथील महानगरपालिकेच्या पुर्व बाजूच्या जुन्या इमारतीचा भाग पाडण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४०९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.९७, रामकृष्णनगर/काबरानगर या वॉर्डाअंतर्गत सुतगिरणी चौक ते काबरानगर या मुख्य रस्त्यावर कमान तयार करण्यात यावी. अशी वॉर्डातील स्थानिक नागरीकांची बऱ्याच वर्षापासून मागणी आहे व या कमानीला “हिंदु हृदयसम्राट मा.बाळासाहेब ठाकरे प्रवेशद्वार” असे नामकरण करावे.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती सीमा काहानूलाल चक्रनारायण

**अनुमोदक:-**श्री.राजेंद्र हिम्मतराव जंजाळ, श्रीमती मनिषा विनोद लोखंडे

मा.महापौर :हा विषय मंजूर, प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.९७, रामकृष्णनगर/काबरानगर या वॉर्डाअंतर्गत सुतगिरणी चौक ते काबरानगर या मुख्य रस्त्यावर तयार करण्यात कमानीला “हिंदु हृदयसम्राट मा.बाळासाहेब ठाकरे प्रवेशद्वार” असे नामकरण करण्यासाठी प्रशासनाने तातडीने कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४१०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.२५ अंतर्गत मोहल्ला मजनुहील येथे मौलाना आझाद रिसर्च सेंटर जवळून (खिजरी दरवाजा लगत) सुमारे ६ मी.रुंद व ६० लांब असा रस्त्याचा मार्ग रशिदपूरा मजनुहील येथे काढण्यात यावे. (जसा रस्ता व्ही.आय.पी.रोड पासून ते शताब्दीनगर कडे जाणारा मार्ग) जेणे करून येथील रहिवासी यांना येणे जाणे करीता योग्य सोय होईल.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन **अनुमोदक:-**श्रीमती शेख समिना इलियास

मा.महापौर :या प्रस्तावाच्या नुसार डिस्पुटेड मॅटर आहे. मालमत्तेचे नुकसान केले यात फौजदारी गुन्हा दाखल झाला आहे. त्यामूळे हा प्रस्ताव स्थगित करण्यात येते.

**ठराव:-**

प्रस्तुत प्रस्ताव स्थगित करण्यात येतो.

**विषय क्रमांक ४११:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सातारा-देवळाई परिसर हा ग्रामपंचायत मध्ये असतांना त्यांना पाणी पुरवठा व इतर सर्व सुविधा मिळत होत्या, महानगरपालिकेत समावेश झाल्यापासून या परिसरात कोणत्याच नागरी सुविधा उपलब्ध करून दिलेल्या नाहीत, सदर परिसरात पिण्याच्या पाण्याची समस्या गंभीर असून या ठिकाणी पाईपलाईन सुध्दा टाकण्यात आलेली नाही व पाण्यासाठी बोअरच्या पाण्यावर अवलंबून रहावे लागते ते पाणी सुध्दा उन्हाळ्यात मिळत नाही. करीता सातारा-देवळाई परिसरात पिण्याच्या पाण्याची सुविधा टँकरद्वारे विनामूल्य करण्यात यावी. करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.राजु रामराव शिंदे

**अनुमोदक:-**श्री.अप्पासाहेब विनायक हिवाळे, श्री.गोकुळसिंग संपतसिंग मलके

श्री.भाऊसाहेब जगताप :राजनगर, मुकूंदनगर वार्ड ९० मध्ये ही विनामुल्य पाणी द्यावे.

श्री.फेरोज खान :सईदा कॉलनी भागातही पिण्याचे पाणी या प्रमाणे द्यावे.

श्री.त्र्यंबक तुपे :सौजन्यनगर भागातही पाणी द्यावे.

मा.महापौर :सातारा-देवळाईसह ज्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याच्या लाईन नाही व तेथे पिण्याचे पाणी पुरवठा करावा लागतो. अशा वसाहतीसह पाणी देण्याची जबाबदारी मनपाची आहे. आताच सदस्यांनी सुचना केल्यानुसार व उन्हाळयाच्या परिस्थितीत जेथे टँकर पुरवठा करणे आवश्यक आहे. तेथे टँकरने पाणी देण्याची कार्यवाही करावी. हा विषय मंजूर

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सातारा-देवळाईचा महानगरपालिकेत समावेश झाल्यापासून नागरी सुविधा पुरविण्याची जबाबदारी मनपाची आहे. या भागात जलवाहीनी टाकण्यात आलेली नाही उन्हाळ्याच्या दिवसात बोअरचे पाणी कमी झाल्याने तीव्र पाणी टंचाईचा सामना नागरीकांना करावा लागत आहे. सातारा-देवळाईच्या नागरीकांना पिण्याच्या पाण्याची सुविधा टँकरद्वारे विनामूल्य पुरविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४१२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अर्थसंकल्प सन २०१७-१८ मध्ये वॉर्ड क्र.६३, अविष्कार कॉलनी अंतर्गत कामाचे लेखाशिर्ष बदलण्याकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | जुने लेखाशिर्ष | नविन लेखाशिर्ष |
|---|---|---|
| १ | वॉर्ड क्र.६३, चिश्तीया कॉलनी, अविष्कार कॉलनी, शुभश्री कॉलनी व साईनगर मध्ये नविन पाण्याची लाईन टाकणे.<br>SCR Ward 05 P.No.44 | वॉर्ड क्र.६३, अविष्कार कॉलनी वॉडामध्ये कचऱ्याचे बकेट वाटप करण्याकरीता खरेदी करावी. र.रु. १० लक्ष. |
| २ | वॉर्ड क्र.६३, अविष्कार कॉलनी अंतर्गत साईनगर, अविष्कार कॉलनी व चिश्तीया कॉलनी मध्ये जलवाहिनी टाकणे. र.रु.१० लक्ष<br>GBR Ward 05 P.No.39 | वॉर्ड क्र.६३, अविष्कार कॉलनी वार्डामध्ये कचऱ्याचे बकेट वाटप करण्याकरीता खरेदी करावी. र.रु.१० लक्ष |
| ३ | वॉर्ड क्र.६३, अविष्कार कॉलनी अंतर्गत साईनगर गार्डन मध्ये जॉगिंग ट्रॅक तयार करणे. र.रु.२० लक्ष | वॉर्ड क्र.६३, अविष्कार कॉलनी अंतर्गत साईनगर उद्यान मध्ये विविध विकास कामे करण्या करीता र.रु.२० लक्ष. |

**सुचक:-**श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख **अनुमोदक:-**श्री.सोहेल शकील शेख

मा.महापौर : प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.६३, अविष्कार कॉलनी अंतर्गत कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | जुने लेखाशिर्ष | नविन लेखाशिर्ष |
|---|---|---|
| १ | वॉर्ड क्र.६३, चिश्तीया कॉलनी, अविष्कार कॉलनी, शुभश्री कॉलनी व साईनगर मध्ये नविन पाण्याची लाईन टाकणे. SCR Ward 05 P.No.44 | वॉर्ड क्र.६३, अविष्कार कॉलनी वॉडामध्ये कचऱ्याचे बकेट वाटप करण्याकरीता खरेदी करावी. र.रु. १० लक्ष. |
| २ | वॉर्ड क्र.६३, अविष्कार कॉलनी अंतर्गत साईनगर, अविष्कार कॉलनी व चिश्तीया कॉलनी मध्ये जलवाहिनी टाकणे. र.रु.१० लक्ष GBR Ward 05 P.No.39 | वॉर्ड क्र.६३, अविष्कार कॉलनी वार्डामध्ये कचऱ्याचे बकेट वाटप करण्याकरीता खरेदी करावी. र.रु.१० लक्ष |
| ३ | वॉर्ड क्र.६३, अविष्कार कॉलनी अंतर्गत साईनगर गार्डन मध्ये जॉगिंग ट्रॅक तयार करणे. र.रु.२० लक्ष | वॉर्ड क्र.६३, अविष्कार कॉलनी अंतर्गत साईनगर उद्यान मध्ये विविध विकास कामे करण्या करीता र.रु.२० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४१३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.५५, भवानीनगर अंतर्गत मोंढा नाका येथे दिनांक ०२.०४.२०१८ रोजी सकाळी ६.३० वा. मनपाच्या सफाई कर्मचाऱ्याने कचऱ्याला आग लावल्यामुळे कचराकुंडीच्या बाजुला असलेले श्री.शंभुलाल भानुशाली यांची दुकान मे.लालजी कानजी या दुकानास आग लागली. या आगीत दुकानात असलेला संपुर्ण माल व साहित्य जळून खाक झालेले आहे. त्यामुळे त्यांचे रु.०७ लक्ष रुपयाचे मोठे आर्थीक नुकसान झालेले आहे. कचऱ्याला आग लावणे हे कायद्याने गुन्हा असतांना सुध्दा मनपा कर्मचाऱ्याने ही आग लावलेली आहे. मनपाचा कर्मचारी या आगीस जबाबदार असल्यामुळे त्यांची नैतिक जबाबदारी ही मनपा प्रशासनाची आहे.

करीता सदरील व्यापाऱ्याला झालेली आर्थिक नुकसान भरपाई म्हणुन रु.०७ लक्ष अदा करण्यात यावे. करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.विकास रतनलाल जैन **अनुमोदक:-**श्री.गजानन भानुदास मनगटे

मा.महापौर :र.रु.०७ लक्ष ऐवजी र.रु.०५ लक्ष देण्याच्या दुरूस्तीसह प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.५५, भवानीनगर अंतर्गत मोंढा नाका येथे दिनांक ०२.०४.२०१८ रोजी सकाळी ६.३० वा.मनपाच्या सफाई कर्मचाऱ्याने कचऱ्याला आग लावल्यामुळे कचराकुंडीच्या बाजुला असलेल्या श्री.शंभुलाल भानुशाली यांचे मे.लालजी कानजी या दुकानास लागलेल्या आगीमुळे दुकानात असलेला संपुर्ण माल व साहित्य जळून खाक झालेले आहे. मनपाचा कर्मचारी या आगीस जबाबदार असल्यामुळे त्यांची नैतिक जबाबदारी ही मनपा प्रशासनाची असल्याने आर्थिक नुकसान भरपाई म्हणुन र.रु.०७ लक्ष ऐवजी र.रु.०५ लक्ष देण्याच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४१४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.५२ मधील मिलकॉर्नर खडकेश्वर येथील एस.बी.आय.बँक ते म.रा.वि.मंडळाच्या लगत असलेल्या कॉलनीस आतापर्यंत कोणतेच नाव देण्यात आले नाही. येथील रहिवासीयांच्या मागणीनुसार या वसाहतीस अद्वैत कॉलनी असे नाव देण्याची मागणी केलेली आहे.

करीता, मिलकॉर्नर खडकेश्वर येथील एस.बी.आय.बँक ते म.रा.वि.मंडळाच्या लगत असलेल्या कॉलनीस अद्वैत कॉलनी असे नांव देण्याकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.एडके विकास प्रकाश **अनुमोदक:-**श्री.खान फेरोज मोईनुद्दीन

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.५२ मधील मिलकॉर्नर खडकेश्वर येथील एस.बी.आय.बँक ते म.रा.वि.मंडळाच्या लगत असलेल्या कॉलनीस अद्वैत कॉलनी असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४१५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दिनांक ११ ते १३ मे २०१८ रोजी औरंगाबाद जिल्हा रोलर स्केटिंग असोसिएशन तर्फे अखिल भारतीय स्केटिंग स्पर्धेचे आयोजन औरंगाबाद शहरात करण्यात आले आहे.

या स्पर्धेमध्ये औरंगाबाद शहरातील अंदाजे २०० खेळाडू व विविध राज्यातून अंदाजे ४०० खेळाडूंना निमंत्रीत करण्यात येणार आहे. ही स्पर्धा ४ वर्षापासून ते १६ वर्षापर्यंत वयोगट व खुला गट असे एकूण आठ गटात मुले व मुली यांची स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे. या स्पर्धेसाठी एकुण खर्च अंदाजे रु.७ लक्ष एवढा अपेक्षित असून या स्पर्धेकरीता औरंगाबाद जिल्हा रोलर स्केटिंग असोसिएशनची आर्थिक अडचण असून या स्पर्धेकरीता औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे प्रायोजित करून ही स्पर्धा अखिल भारतीय महापौर चषक क्रिडा स्पर्धा म्हणुन घेण्यात यावी.

तरी वरील प्रमाणे स्पर्धेला मान्यता देऊन ही स्पर्धा अखिल भारतीय महापौर चषक म्हणुन घेण्यात यावी. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे **अनुमोदक:-**श्री.गजानन भानुदास मनगटे

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दिनांक ११ ते १३ मे २०१८ रोजी औरंगाबाद जिल्हा रोलर स्केटिंग असोसिएशन तर्फे अखिल भारतीय स्केटिंग स्पर्धेचे आयोजन औरंगाबाद शहरात करण्यात आले असून स्पर्धेत ४ वर्षापासून ते १६ वर्षापर्यंत वयोगट व खुला गट असे एकूण आठ गटात मुले व मुली यांचा समावेश आहे. या स्पर्धेसाठी एकुण खर्च अंदाजे रु.७ लक्ष एवढा अपेक्षित असून ही स्पर्धा औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे अखिल भारतीय महापौर चषक क्रिडा स्पर्धा म्हणुन घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्रमांक ४१६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासन अल्पसंख्यांक विकास विभाग मंत्रालय या कार्यालया मार्फत दिनांक १८.०६.२०१५ रोजीची शासन निर्णयाप्रमाणे राज्यातील अल्पसंख्यांक समुदायाचा एकंदर जीवनमानाचा दर्जा उंचाविण्यासाठी अल्पसंख्यांक विकास विभागाच्या योजनेअंतर्गत वॉर्ड क्र.४४ येथील खालील कामे शासन निर्णय परिच्छेद अ.११ चे परिपुर्ती करीत आहे.

१. वॉर्ड क्र.४४ मधील मकसुद कॉलनी भागात व्हाईट टॉपींग रस्ता तयार करणे. - २५ लक्ष.
२. वॉर्ड क्र.४४ करीम कॉलनी भागात सिमेंट कॉंक्रेट रस्ता तयार करणे. - २५ लक्ष.
३. वॉर्ड क्र.४४ इमाद मस्जीद ते मदीना मस्जीद पर्यंत कॉंक्रेट रस्ता तयार करणे. - २५ लक्ष.
४. वॉर्ड क्र.४४ फारुखी एसटीडी परिसरात सिमेंट कॉंक्रेट रस्ता तयार करणे. - २५ लक्ष.
५. वॉर्ड क्र.४४ युनूस कॉलनी परिसरात नवीन ड्रेनेज लाईन टाकणे. - २५ लक्ष.

करीता, उपरोक्त कामाचा प्रस्ताव मंजुर करून अल्पसंख्यांक विभागाकडुन सदरील कामासाठी अनुदान मिळण्यासाठी प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांना पाठविण्यासाठी पुढील प्रशासकीय कार्यवाही करण्या करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती साजेदा सईद फारूखी **अनुमोदक:-**श्रीमती सरिता अरुण बोर्डे

मा.महापौर :या योजनेअंतर्गत किती निधी येणार आहे? व केव्हा येणार आहे? तो सर्व एकत्रित करून त्या-त्या वॉर्डात समान निधी देता येईल. अशी कार्यवाही करण्यात यावी. प्रस्ताव मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.४४ येथे अल्पसंख्यांक विकास विभागाच्या योजनेअंतर्गत खालील कामे करण्यास मंजुरी देण्यात येते.

१. वॉर्ड क्र.४४ मधील मकसुद कॉलनी भागात व्हाईट टॉपींग रस्ता तयार करणे. - २५ लक्ष.
२. वॉर्ड क्र.४४ करीम कॉलनी भागात सिमेंट कॉंक्रेट रस्ता तयार करणे. - २५ लक्ष.
३. वॉर्ड क्र.४४ इमाद मस्जीद ते मदीना मस्जीद पर्यंत कॉंक्रेट रस्ता तयार करणे. - २५ लक्ष.
४. वॉर्ड क्र.४४ फारुखी एसटीडी परिसरात सिमेंट कॉंक्रेट रस्ता तयार करणे. - २५ लक्ष.
५. वॉर्ड क्र.४४ युनूस कॉलनी परिसरात नवीन ड्रेनेज लाईन टाकणे. - २५ लक्ष.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ४१७:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासन अल्पसंख्यांक विकास विभाग मंत्रालय या कार्यालयामार्फत दिनांक १८.०६.२०१५ रोजीचे शासन निर्णयाप्रमाणे राज्यातील अल्पसंख्यांक समुदायाचा एकंदर जीवनमानाचा दर्जा उंचाविण्यासाठी अल्पसंख्यांक विकास विभागाच्या योजनेअंतर्गत मोहल्ला उस्मानपुरा येथील खालील कामे शासन निर्णय परिच्छेद अ.११ चे परिपुर्ती करीत आहे.

१. वॉर्ड क्र.७१ मधील मुख्य उस्मानपुरा भागात व्हाईट टॉपींग रस्ता तयार करणे. - २५ लक्ष.
२. वॉर्ड क्र.७१ मधील उस्मानपुरा आशुरखाना भागात सिमेंट कॉंक्रेट रस्ता तयार करणे. - २५ लक्ष.
३. वॉर्ड क्र.७१ क्रांतीनगर काली मस्जीद परिसरात सिमेंट कॉंक्रेट रस्ता तयार करणे. - २५ लक्ष.
४. वॉर्ड क्र.७१ उस्मानपुरा अंतर्गत पीरबाजार परिसरात सिमेंट कॉंक्रेट रस्ता तयार करणे. - २५ लक्ष.

करीता, उपरोक्त कामाचा प्रस्ताव मंजुर करून अल्पसंख्यांक विभागाकडुन सदरील कामासाठी अनुदान मिळण्यासाठी प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांना पाठविण्यासाठी पुढील प्रशासकीय कार्यवाही करण्या करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती सरिता अरुण बोर्डे **अनुमोदक:-**श्रीमती साजेदा सईद फारूखी

मा.महापौर :या योजनेअंतर्गत किती निधी येणार आहे? व केव्हा येणार आहे? तो सर्व एकत्रित करून त्या-त्या वॉर्डात समान निधी देता येईल. अशी कार्यवाही करण्यात यावी. प्रस्ताव मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.७१ येथे अल्पसंख्यांक विकास विभागाच्या योजनेअंतर्गत खालील कामे करण्यासाठी प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांचेकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते.

१. वॉर्ड क्र.७१ मधील मुख्य उस्मानपुरा भागात व्हाईट टॉपींग रस्ता तयार करणे. - २५ लक्ष.
२. वॉर्ड क्र.७१ मधील उस्मानपुरा आशुरखाना भागात सिमेंट कॉंक्रेट रस्ता तयार करणे. - २५ लक्ष.
३. वॉर्ड क्र.७१ क्रांतीनगर काली मस्जीद परिसरात सिमेंट कॉंक्रेट रस्ता तयार करणे. - २५ लक्ष.
४. वॉर्ड क्र.७१ उस्मानपुरा अंतर्गत पीरबाजार परिसरात सिमेंट कॉंक्रेट रस्ता तयार करणे. - २५ लक्ष.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४१८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३६, नारेगाव ब्रिजवाडी अंतर्गत राजेंद्रनगर येथील नवीन सिमेंट कॉंक्रीटीकरण रस्त्याला शिवसेना प्रमुख "बाळासाहेबजी ठाकरे मार्ग" असे नाव देण्यात यावे. करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप **अनुमोदक:-**श्री.विकास रतनलाल जैन

मा. महापौर :स.श्रीमती सानप यांनी ब्रिजवाडी अंतर्गत रस्त्यास शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे नाव देणे बाबतचा विषय आहे. विषय मंजूर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३६, नारेगाव ब्रिजवाडी अंतर्गत राजेंद्रनगर येथील नवीन सिमेंट कॉंक्रीटीकरण रस्त्याला शिवसेना प्रमुख "बाळासाहेबजी ठाकरे मार्ग" असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४१९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३६, नारेगाव-ब्रिजवाडी अंतर्गत उत्तरानगरी येथील नवीन डांबरीकरण करण्यात आलेल्या रस्त्यास ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक व "स्व.योगीराजजी रानोजी सानप" यांचे नाव देण्यात यावे. करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप **अनुमोदक:-**श्री.विकास रतनलाल जैन

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३६, नारेगाव-ब्रिजवाडी अंतर्गत उत्तरानगरी येथील नवीन डांबरीकरण करण्यात आलेल्या रस्त्यास ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक व "स्व.योगीराजजी रानोजी सानप" यांचे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४२०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, चिकलठाणा, औद्योगिक क्षेत्र, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून औरंगाबाद महानगरपालिकेकडे विकास कामानुषंगाने केवळ रस्ता व पथदिवे देखभाल दुरूस्ती आणि विकसीत करणे करीता हस्तांतरीत करण्यात आलेले आहे. त्यानुसार चिकलठाणा औद्योगिक क्षेत्रातील रस्ते तसेच पथदिव्यांची देखभाल व दुरूस्तीची कामे औरंगाबाद महानगरपालिकेकडून होणे अपेक्षीत आहे. परंतु निधी उपलब्धते अभावी चिकलठाणा औद्योगिक क्षेत्रातील बहुतांश भागातील रस्त्यांचे मागील बऱ्याच वर्षांपासून मजबुतीकरण व डांबरीकरण झालेले नाही.

दरम्यान चिकलठाणा येथील मसिआ या औद्योगिक संघटनेकडून या विषयीचे निवेदन मा.उद्योग मंत्री महोदयांना देण्यात आलेले आहे. तसेच वेळोवेळी विविध संघटना आणि उद्योजक यांचेकडून रस्ते दुरूस्ती, नुतन विकास आणि पथदिव्यांची व्यवस्था याबाबत तक्रारी प्राप्त होत आहेत. या स्थिती बाबत मा.मंत्री महोदय यांना दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ (स्थापत्य विभाग) यांचे चिकलठाणा औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यांचे मजबुतीकरण व डांबरीकरण तसेच पथदिव्यांच्या देखभाल व दुरूस्तीबाबत संदर्भीय पत्र प्राप्त झाले आहे. पत्राच्या अनुषंगाने सदर रस्ते व पथदिवे महानगरपालिकेस हस्तांतरीत झाले असल्याने त्याचा विकास महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून करणेकरीता महानगरपालिकेचे नाहरकत प्रमाणपत्राची मागणी केली आहे.

वरील स्थितीचा विचार करता महानगरपालिका प्राधिकरणाकडे असलेल्या चिकलठाणा औद्योगिक वसाहतीमधील रस्ते विकास व पथदिवे दुरूस्ती याकरीता नाहरकत प्रमाणपत्र देणेविषयी मा.सर्वसाधारण सभेची विशेष धोरण म्हणुन मान्यता आवश्यक आहे. करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

श्री.विजय औताडे :एमआयडीसी कार्यालयास औद्योगिक क्षेत्रामध्ये रस्ते, लाईट, ड्रेनेज इ.सुविधा पुरविणे,

श्री.विकास जैन :रस्त्याची दुरूस्ती करणे, या अशा कामांकरीता एन.ओ.सी. देण्याचा प्रस्ताव सभेसमोर आहे.

श्री.राजु शिंदे मा.श्री.सुभाषजी देसाई, उद्योगमंत्री, महाराष्ट्र राज्य आणि इंडस्ट्रियल असोसिएशन यांचेशी चर्चा झाल्यानुसार औद्योगिक क्षेत्रातील मालमत्ता कर वसुलीचे अधिकार एम.आय.डी.सी.ला देण्यात यावेत असा निर्णय सभागृहात घ्यावा आणि यातील ५० टक्के हिस्सा एमआयडीसीने महापालिकेस द्यावा. औद्योगिक क्षेत्रातील रस्ते, लाईट, ड्रेनेज, पाणीपुरवठा, कचरा व्यवस्थापन या नागरी सुविधा एमआयडीसीने पुरवाव्यात व भविष्यात त्यांची देखभाल दुरूस्तीची जबाबदारी सुध्दा एमआयडीसीचीच राहील. या अटीवर त्यांना ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात यावे.

मा.महापौर :रस्ते विकास एमआयडीसी मध्ये ना हरकत प्रमाणपत्र देणे. प्रस्ताव दुरूस्तीसह मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ (स्थापत्य विभाग) यांचे चिकलठाणा औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यांचे मजबुतीकरण व डांबरीकरण तसेच पथदिव्यांच्या देखभाल व दुरूस्ती, जलनिस्सा:रण वाहिनी व कचरा व्यवस्थापनाबाबत मा.मंत्री महोदय यांना दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने सदर रस्ते व पथदिवे महानगरपालिकेस हस्तांतरीत झाले असल्याने त्याचा विकास महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून करणेकरीता व भविष्यात देखभाल दुरूस्ती करणेबाबत महानगरपालिकेचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यास मंजुरी देण्यात येते. मा.ना.श्री.सुभाषजी देसाई, उद्योगमंत्री, महाराष्ट्र राज्य आणि इंडस्ट्रियल असोसिएशन यांचेशी चर्चा झाल्यानुसार औद्योगिक क्षेत्रातील मालमत्ता कर वसुलीचे अधिकार एम.आय.डी.सी.ला देण्यात यावेत, यातील ५० टक्के हिस्सा एमआयडीसीने महापालिकेस नियमितपणे द्यावा, औद्योगिक क्षेत्रातील रस्ते, लाईट, ड्रेनेज, पाणीपुरवठा, कचरा व्यवस्थापन या नागरी सुविधा एमआयडीसीने पुरवाव्यात, एमआयडीसी भागातील कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी प्रकल्प उभारावा, या अटीवर एमआयडीसीला ना-हरकत प्रमाणपत्र देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ४२१:-</u>**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहागंज जलकुंभ येथील नवाबपुरा प्रभागात पाणीपुरवठा करणारी २५० मीमी व्यासाची एसी जलवाहीनी ही विकास रस्त्याच्या कामात बाधीत होत असल्याने शहागंज जलकुंभ ते चंपाचौक दरम्यान रस्त्याच्या कडेने नवीन जलवाहीनी टाकणे गरजेचे आहे. हिन्दी भवन ते हरी मस्जीद या भागात पाणी पुरवठा करणारी मुख्य जलवाहीनी ही २५० मीमी व्यासाची एसी प्रकारातील असून जलवाहीनीचे आर्युमान हे ४० वर्षापेक्षा जास्त झाले आहे. त्याचप्रमाणे वॉर्डात अनेक ठिकाणी एसी जलवाहीनी असून या जलवाहीन्यांचे आर्युमान देखील जास्त झाले असल्याने जलवाहीन्यांची देखभाल दुरूस्ती वारंवार करावी लागते. तसेच प्रभागामध्ये दुषित पाणी पुरवठा होण्याचे प्रमाण देखील वाढलेले आहे. या सर्व बाबींचा विचार करून विकास रस्त्यात बाधीत होणारी जलवाहीनी स्थलांतरीत करण्यासाठी नविन ३०० मीमी व्यासाची डीआयके-७ जलवाहीनी टाकणे तसेच विविध गल्ल्यांमध्ये असलेल्या एसी वाहीन्या बदलण्याकरीता नव्याने विविध व्यासाच्या डीआयके-७ जलवाहीनी टाकणे गरजेचे आहे.

सदरील कामाचे अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाच्या सन २०१६-१७ व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०१५-१६ च्या दरसुचीनूसार तयार करण्यात आले असून अंदाजपत्रकीय र.रु.९१,८३,६८४/- इतकी आहे. सदरील कामासाठी अर्थसंकल्प २०१७-१८ या वित्तीय वर्षाच्या अर्थसंकल्पात भांडवली खर्च अंदाजपत्रक मा.महापौर यांनी सुचविलेली अत्यावश्यक कामे लेखाशिर्ष अंतर्गत मा.महापौर यांचे पत्र क्रमांक/मनपा/महापौर/२०१७/१६८ दिनांक २७.१२.२०१७ नुसार रु.२५.०० लक्ष तरतुद उपलब्ध करून दिलेली आहे. प्रस्तावित लेखाशिर्ष अंतर्गत रु.२०.०० कोटींची तरतुद सुधारीत अर्थसंकल्प सन २०१७-१८ मध्ये करणे बाबत मा.महापौर यांनी पत्र क्रमांक८९/२०१७ दिनांक २९.११.२०१७ नुसार कळविले आहे. सुधारित अर्थसंकल्प सादर करतांना सदरील लेखाशिर्षा अंतर्गत तरतुद वाढ करण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

करीता. वॉर्ड क्र.४६ अंतर्गत शहागंज जलकुंभ ते चंपाचौक व हिन्दी भवन ते हरी मस्जीद पर्यंत नवीन ३०० मीमी व्यासाची डीआयके-७ जलवाहीनी टाकणे तसेच विविध गल्ल्यांमध्ये असलेल्या एसी जलवाहीन्या बंद करण्यासाठी विविध व्यासाच्या डीआयके-७ जलवाहीन्या टाकण्याकरीता र.रु.९१,८३,६८४/- चे अंदाजपत्रक मा.सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

श्री.त्र्यंबक तुपे :ज्या-ज्या संचिका पाणीपुरवठयाच्या प्रलंबीत आहे, त्या मंजूरी साठी आदेशीत करावे. त्यासाठी बजेट नसेल तर, तरतूद करण्याचे सांगावे. विश्वभारती कॉलनी भागातील पाणीपुरवठा संदर्भात एक संचिका होती त्यास तरतूद नाही असे सांगतात. त्यासाठी तरतूद करावी.

मा.महापौर :पाणीपुरवठ्याच्या निधी अभावी ज्या संचिका प्रलंबीत आहे. यासाठी सन २०१८-२०१९ च्या बजेट मध्ये निधी उपलब्ध करून देण्यात येईल. तसे पत्र स.सभापती व महापौर पत्र देतील. हा विषय मंजूर करण्यात येतो.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.४६ अंतर्गत शहागंज जलकुंभ ते चंपाचौक व हिन्दी भवन ते हरी मस्जीद पर्यंत नवीन ३०० मीमी व्यासाची डीआयके-७ जलवाहीनी टाकणे तसेच विविध गल्ल्यांमध्ये असलेल्या एसी जलवाहीन्या बंद करण्यासाठी विविध व्यासाच्या डीआयके-७ जलवाहीन्या टाकण्याकरीता र.रु.९१,८३,६८४/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ४२२:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सार्वजनिक सेवा/उपक्रम अंतर्गत देखभाल दुरुस्तीचे कामे कार्यरत नऊ झोन कार्यालयामार्फत करण्यात येतात. औरंगाबाद महानगरपालिका कार्यक्षेत्राची हद्दवाढ होऊन, सातारा-देवळाई तत्कालीन नगरपरिषदेचा देखील महानगरपालिकेत समावेश झालेला आहे. लोकसंख्येनुसार शहराचा विस्तार वाढत असून, त्यात गुंठेवारी वसाहतींचा समावेश देखील मोठ्या प्रमाणावर आहे. याचाच एक भाग म्हणून मागील काही वर्षात औरंगाबाद महानगरपालिकेचा समावेश ड वर्गात करण्यात आलेला आहे. मात्र त्या प्रमाणात औरंगाबाद महानगरपालिकेकडे अभियंता/तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध नाही. गेल्या २५ वर्षापासून भरती प्रक्रिया राबविली नसल्याने आणि बहुतांश कार्यरत अभियंते नियतवयोमानाने सेवानिवृत्त झाल्याने कार्यरत अभियंत्यांवर कामाची अतिरिक्त जबाबदारी सोपविण्यात आली आहे. यामध्ये बऱ्याच उप विभागासाठी अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आलेला आहे. अभियंत्याची तोकडी संख्या विचारात घेऊन विद्युत विभागासाठी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी आणि पाणी पुरवठ्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ यांचेकडून प्रतिनियुक्ती अभियंते घेणे बाबत पत्रव्यवहार झाला. मात्र संबंधीत कार्यालयाकडून अभियंते उपलब्ध होऊ शकले नाही.

औरंगाबाद शहर समांतर पाणी पुरवठा योजनेसाठी नियुक्त कन्सेशनर यांना दिनांक ०१.१०.२०१६ रोजी औरंगाबाद महानगरपालिकेने टर्मिनेशन नोटीस दिली असून सध्या हे प्रकरण मा.सर्वोच्च न्यायालयात सुनावणी अंतर्गत आणि आर्बिट्रेशन मध्ये आहे. दिनांक ०१.१०.२०१६ रोजी योजना महानगरपालिकेने ताब्यात घेऊन, संपूर्ण पाणी पुरवठा विषयक कामे महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहेत. त्यानुसार जायकवाडी उद्‌भव ते शहरापर्यंत अशुध्द उध्दरण वाहिन्या, जलशुध्दीकरण केंद्र, शुध्द उध्दरण व गुरुत्व वाहिन्या, संतुलीत जलकुंभ आदी अंतर्भुत उपांगे असलेल्या पाणीपुरवठा योजनांची देखभाल दुरुस्ती, संचलन व इतर आकस्मिक उद्‌भवणारी कामे औरंगाबाद महानगरपालिकेकडून करण्यात येत आहेत.

औरंगाबाद पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाकडून औरंगाबाद महानगरपालिकेस सन १९९८ साली योजनेवर कार्यरत अभियंते/कर्मचाऱ्यांसह हस्तांतरीत झालेली आहे. योजनेवर कार्यरत प्रतिनियुक्तीवरील अभियंत्यांपैकी श्री.के.पी. धांडे, शाखा अभियंता हे जुन २००३ पासून महानगरपालिकेत कार्यरत आहेत. उक्त नमुद सर्व कामांची जबाबदारी श्री.के.पी.धांडे, शाखा अभियंता यांचेकडे सोपविली आहे. श्री.धांडे, शाखा अभियंता यांची औरंगाबाद महानगरपालिकेतील प्रतिनियुक्तीवरील सेवा १४ वर्षे झालेली आहे. उक्त नमुद प्रमाणे महानगरपालिकेत कार्यरत अभियंत्यांची तोकडी संख्या तसेच औरंगाबाद शहर पाणी पुरवठा योजनेवरील श्री.धांडे यांचा अनुभव विचारात घेता त्यांना महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कायम करणे बाबत प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

श्री.के.पी.धांडे, शाखा अभियंता यांनी त्यांची उर्वरीत सेवा महानगरपालिका आस्थापनेवर कायमस्वरुपी वर्ग होऊन पूर्ण करण्याची लेखी संमती दिली आहे. प्रतिनियुक्ती आदेशातील कायमचे समादेशन, अट क्र.१८ नुसार त्यांची सेवा महानगरपालिका आस्थापनेवर कायम करण्याचे प्रावधान आहे. तरी श्री.धांडे यांची सेवा अनुक्रमे (१) ते ज्या दिवशी महानगरपालिकेमध्ये प्रतिनियुक्तीवर रुजु झाले, त्या तारखेपासून त्यांची सेवा जेष्ठता पदोन्नती पात्रतेसह लागु राहील. (२) त्यांचे चालु वेतन (Pay Protect) करणे आणि (३) महानगरपालिका अधिकारी/कर्मचारी यांना देय असलेले पेन्शन व इतर फायदे त्यांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणात ते रुजू झाल्याच्या तारखेपासून देय राहील इत्यादी अ.क्र. १ ते ३ ला अधीन राहून श्री.के.पी.धांडे, शाखा अभियंता यांची उर्वरीत सेवा महानगरपालिका आस्थापनेवर कायम करणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :श्री.के.पी धांडे, शाखा अभियंता हे चांगले अधिकारी आहेत. त्यांना मनपा सेवेत घेण्याचा विषय आहे. विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाकडून प्रतिनियुक्तीवरील श्री.के.पी.धांडे, शाखा अभियंता यांनी त्यांची उर्वरीत सेवा महानगरपालिका आस्थापनेवर कायमस्वरुपी वर्ग होऊन पूर्ण करण्याची लेखी संमती दिली आहे. प्रतिनियुक्ती आदेशातील कायमचे समादेशन, अट क्र.१८ नुसार त्यांची सेवा महानगरपालिका आस्थापनेवर कायम करण्याचे प्रावधान आहे. तरी श्री.धांडे यांची सेवा अनुक्रमे (१) ते ज्या दिवशी महानगरपालिकेमध्ये प्रतिनियुक्तीवर रुजु झाले, त्या तारखेपासून त्यांची सेवा ज्येष्ठता पदोन्नती पात्रतेसह लागु करण्यास, (२) त्यांचे चालु वेतन (Pay Protect) करण्यास आणि (३) महानगरपालिका अधिकारी/कर्मचारी यांना देय असलेले पेन्शन व इतर फायदे त्यांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणात ते रुजू झाल्याच्या तारखेपासून देय असतील इत्यादी अ.क्र. १ ते ३ ला अधीन राहून श्री.के.पी.धांडे, शाखा अभियंता यांची उर्वरीत सेवा महानगरपालिका आस्थापनेवर कायम करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४२३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहरातील विविध भागातील नागरिकांची तहान भागविण्यासाठी महानगरपालिकेने एम.आय.डी.सी. कडून ५ एमएलडी पाणी घेण्याचे ठरविले आहे. त्यापैकी सातारा-देवळाई परिसरातील नागरीकांना २ एमएलडी पाणी पुरवठा करण्यात यावा. कारण या परिसरात पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना वन-वन भटकावे लागते, दुरवरून उन्हा-तान्हात पाणी आणावे लागते, तसेच सातारा-देवळाई परिसर हा सन-२०१५ पासून मनपामध्ये समाविष्ट केल्यापासून आपण या ठिकाणी नागरिकांना कोणतीच सुख-सुविधा पुरविली नाही. या परिसरात नागरी लोकवस्ती मोठ्या प्रमाणात असुन पिण्याचे पाणी मिळविणे कठीण झाले आहे. कमीत कमी रोजच्या गरजेनुसार त्यांना आपण पाणी पुरवठा केला पाहिजे.

करीता, महानगरपालिकेने एम.आय.डी.सी.कडून ५ एमएलडी पाणी घेण्याचे ठरविले आहे. त्यापैकी सातारा-देवळाई परिसरातील नागरीकांना २ एमएलडी पाणी पुरवठा करण्यात यावा. करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.राजु रामराव शिंदे

**अनुमोदक:-**श्री.अप्पासाहेब विनायक हिवाळे, श्री.गोकुळसिंग संपतसिंग मलके,
श्री.मनोज आसाराम बल्लाळ, श्रीमती सुनिता रामराव चव्हाण

मा.महापौर :ज्या पध्दतीने ५ एमएलडी पाणी एन-५ च्या टाकीसाठी एमआयडीसीकडून घेत आहोत. त्याप्रमाणेच सातारा-देवळाई साठी ५ एमएलडी व्यतिरीक्त आणखी २ एमएलडी पाणी वाढीव मिळत असेल तर प्रशासनाने तसा पत्रव्यवहार एमआयडीसीचे मुख्य अभियंता यांचेशी करावा. या दुरूस्तीसह हा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एम.आय.डी.सी.कडून घेण्यात येणारे ५ एमएलडी पाणीपैकी सातारा-देवळाई परिसरातील नागरीकांना २ एमएलडी पाणी पुरवठा करण्यास मंजुरी देण्यात येते तसेच ५ एमएलडी व्यतिरीक्त आणखी २ एमएलडी वाढीव पाणीपुरवठा मिळत असल्यास त्याप्रमाणे कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४२४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कुमारी सिध्दी प्रविण हत्तेकर ही शहरातील उदयोन्मुख जिम्नॅस्टीक आहे. तिची इंडोनिशिया येथे होणाऱ्या ज्युनिअर आशियाई स्पर्धेसाठी भारताच्या संघात निवड झालेली आहे. ही स्पर्धा २५ ते २८ एप्रिल २०१८ या दरम्यान जकार्ता इंडोनेशिया येथे होणार आहे. सन २०१८ च्या युवा ऑलिम्पिक स्पर्धेसाठी या स्पर्धेतून खेळाडूंची निवड होणार आहे. त्या दृष्टीने ही स्पर्धा अत्यंत महत्वाची आहे.

कु.सिध्दी हत्तेकरची आर्थिक परिस्थिती बेताचीच असल्यामुळे तिला आर्थिक मदतीची गरज आहे. औरंगाबाद शहराची किर्ती आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहचविणाऱ्या या खेळाडू साठी महानगरपालिकेमार्फत जकार्ता इंडोनेशिया येथील स्पर्धेत सहभागी होण्यासाठी र.रु.१,५०,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लाख पन्नास हजार फक्त) ची आर्थिक मदत करण्यात यावी.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.दिलीप गंगाधर थोरात **अनुमोदक:-**श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत

मा.महापौर :कु.हत्तेकर हिला इंडोनेशिया येथे जाणेसाठी र.रु.१.५० लक्ष आर्थिक मदत करणे. प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कु.सिध्दी हत्तेकर, जिम्नॅस्टीक खेळाडू हीस महानगरपालिकेमार्फत जकार्ता इंडोनेशिया येथील स्पर्धेत सहभागी होण्यासाठी र.रु.१,५०,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लाख पन्नास हजार फक्त) ची आर्थिक मदत करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४२५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेच्या सर्व माध्यमिक शाळेमध्ये सॅनीटरी पॅड वेडींग मशीन बसविण्यात यावे. येत्या जुन महिन्यापासून प्रत्येक माध्यमिक शाळांमध्ये सॅनीटरी पॅड वेडींग मशीन बसविण्यात यावे जेणे करून मुलींच्या मनामध्ये असुरक्षिततेची भावना राहणार नाही.

माध्यमिक शाळेत शिकणाऱ्या मुलींसाठी हा प्रस्ताव मंजुर करावा. करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती सुरेखा बाळासाहेप सानप

**अनुमोदक:-**श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत, श्री.विकास रतनलाल जैन

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या सर्व माध्यमिक शाळेमध्ये जुन महिन्यापासून सॅनीटरी पॅड वेडींग मशीन बसविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४२६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१११ या वॉर्डात डांबरीकरणाच्या दोन कामाचे स्थळ बदल करणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

१. वॉर्ड क्र.१११ अंतर्गत शंभूनगर भागातील हनुमान मंदिर समोर रस्त्याचे पुर्न:डांबरीकरण करणे.
२. वॉर्ड क्र.१११, प्रियदर्शनी, इंदिरा नगर मुख्य रस्त्याचे पुर्न:डांबरीकरण करणे

**या कामाचे ऐवजी**

१. वॉर्ड क्र.१११ अंतर्गत हनुमान मंदिर ते नुरी मस्जिद पर्यंतच्या रस्त्याचे पुर्न:डांबरीकरण करणे.
२. वॉर्ड क्र.१११ अंतर्गत विविध ठिकाणी पुर्न:डांबरीकरण करणे.

**सुचक:-**श्रीमती सलीमा बाबुभाई कुरेशी **अनुमोदक:-**श्रीमती पठाण अस्मा फिरदोस रफिक पठाण

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१११ या वॉर्डात खालीलप्रमाणे कामाचे स्थळ बदल करण्यास मंजुरी देण्यात येते.

१. वॉर्ड क्र.१११ अंतर्गत शंभूनगर भागातील हनुमान मंदिर समोर रस्त्याचे पुर्न:डांबरीकरण करणे.
२. वॉर्ड क्र.१११, प्रियदर्शनी, इंदिरा नगर मुख्य रस्त्याचे पुर्न:डांबरीकरण करणे

**या कामाचे ऐवजी**

१. वॉर्ड क्र.१११ अंतर्गत हनुमान मंदिर ते नुरी मस्जिद पर्यंतच्या रस्त्याचे पुर्न:डांबरीकरण करणे.
२. वॉर्ड क्र.१११ अंतर्गत विविध ठिकाणी पुर्न:डांबरीकरण करणे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४२७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.२१, बुढ्ढीलैन-कबाडीपुरा असलेल्या नेहरू भवन सध्या पडीक अवस्थेत असून पुर्वी नेहरू भवनपासून मनपास आर्थिक महसूल प्राप्त होत होते. सध्या नेहरू भवन विकसीत केल्यास मनपास पुन्हा महसूल प्राप्त होईल.

नेहरू भवनचे बांधकाम करून नुतणीकरण केल्यास यास अंदाजे ०२ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे, या कामास मनपा अर्थसंकल्प सन २०१८-१९ मध्ये आर्थिक तरतुद करून नेहरू भवन विकसित करण्याचे काम करण्यासाठी मंजुरी मिळण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक:- श्रीमती परवीन कैसर खान अनुमोदक:-श्री.खान फेरोज मोईनुद्दीन

मा.महापौर :नेहरूभवन नुतणीकरण करणे यासाठी शासनाकडून निधी मागवायचा आहे. तो निधी आला नाही, तर मनपाच्या मार्फत नुतनीकरण करणेचे अंदाजपत्रक सादर करण्यात यावे या नुसार विषय मंजूर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.२१, बुढ्ढीलैन-कबाडीपुरा येथे असलेल्या नेहरू भवनचे बांधकाम करून नुतणीकरण करण्यास र.रु.०२ कोटी रुपये खर्च अपेक्षित असल्याने या कामासाठी शासनाकडून निधी मागविण्यात यावा. जर शासनाकडून निधी न आल्यास मनपा अर्थसंकल्प सन २०१८-१९ मध्ये आर्थिक तरतुद करून नेहरू भवन विकसित करण्याचे काम करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४२८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २०१८-२०१९ च्या अर्थसंकल्पातील मा.स्थायी समितीने सुचविलेले खालील काम रद्द करून प्रभागात आवश्यक असणारी दुसरी विकास कामे करणे बाबत लेखाशिर्ष बदला बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | रद्द करावयाचे कामाचे नाव | करावयाचे कामाचे नाव |
|---|---|---|
| १ | वॉर्ड क्र.३०, पवन नगर अंतर्गत वेगवेगळ्या ठिकाणचे तुटलेले पेव्हर ब्लॉक बसविणे. रुपये ०५ लक्ष. | वॉर्ड क्र.३०, पवननगर अंतर्गत वेगवेगळ्या ठिकाणचे तुटलेले पेव्हर ब्लॉक व बेंचेस बसविणे. |
| २ | झोन क्र.४ स्पील पेज नं.९८, अ.क्र.१८४ तरतुद ०५ लक्ष. | |

सुचक:- श्री.नितीन रमण चित्ते अनुमोदक:- श्रीमती पुष्पा उत्तमराव रोजतकर

मा.महापौर : प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २०१८-२०१९ च्या अर्थसंकल्पातील मा.स्थायी समितीने सुचविलेले प्रस्तावातील काम रद्द करून प्रभागात आवश्यक असणारी दुसरी विकास कामे करण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | रद्द करावयाचे कामाचे नाव | करावयाचे कामाचे नाव |
|---|---|---|
| १ | वॉर्ड क्र.३०, पवन नगर अंतर्गत वेगवेगळ्या ठिकाणचे तुटलेले पेव्हर ब्लॉक बसविणे. रुपये ०५ लक्ष. | वॉर्ड क्र.३०, पवननगर अंतर्गत वेगवेगळ्या ठिकाणचे तुटलेले पेव्हर ब्लॉक व बेंचेस बसविणे. |
| २ | झोन क्र.४ स्पील पेज नं.९८, अ.क्र.१८४ तरतुद ०५ लक्ष. | |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४२९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.०९ मयुरनगर अंतर्गत विविध ठिकाणी खालील दर्शविलेल्या विकास कामांचे लेखाशिर्ष बदलण्याबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| पान क्रमांक | जुने कामांचे नाव ह्यापैकी | त्याऐवजी नवीन कामांचे नाव |
|---|---|---|
| Zone-04-Spill P.No.-91 Sr.No.98 | वॉर्ड क्र.०९ मयुरनगर-सुदर्शननगर अंतर्गत एन-११ दिपनगर येथील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे. (र.रु.९९ लक्ष ५६ हजार) | १. वॉर्ड क्र.९, मयुरनगर येथे सभागृह बांधणे. (र.रु.२५ लक्ष).<br>२. वॉर्ड क्र.९, मयुरनगर, गजाननगर ओपन स्पेस विकसीत करणे. (र.रु.२५ लक्ष).<br>३. वॉर्ड क्र.९, सुदर्शननगर, द्वारकानगर, दिपनगर ओपन स्पेस विकसीत करणे. (र.रु.२५ लक्ष).<br>४. वॉर्ड क्र.९ अंतर्गत वृक्षारोपण करण्यासाठी ट्री गार्ड बसविणे. (र.रु.१० लक्ष) |

सुचक:-श्रीमती स्वाती किशोर नागरे अनुमोदक:-श्री.नितीन दशरथ साळवी

मा.महापौर : प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.०९ मयुरनगर अंतर्गत विविध ठिकाणी खालील दर्शविलेल्या विकास कामांचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| पान क्रमांक | जुने कामांचे नाव ह्यापैकी | त्याऐवजी नवीन कामांचे नाव |
|---|---|---|
| Zone-04-Spill P.No.-91 Sr.No.98 | वॉर्ड क्र.०९ मयुरनगर-सुदर्शननगर अंतर्गत एन-११ दिपनगर येथील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे. (र.रु.९९ लक्ष ५६ हजार) | १. वॉर्ड क्र.९, मयुरनगर येथे सभागृह बांधणे. (र.रु.२५ लक्ष).<br>२. वॉर्ड क्र.९, मयुरनगर, गजाननगर ओपन स्पेस विकसित करणे. (र.रु.२५ लक्ष).<br>३. वॉर्ड क्र.९, सुदर्शननगर, द्वारकानगर, दिपनगर ओपन स्पेस विकसित करणे. (र.रु.२५ लक्ष).<br>४. वॉर्ड क्र.९ अंतर्गत वृक्षारोपण करण्यासाठी ट्री गार्ड बसविणे. (र.रु.१० लक्ष) |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४३०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दिवंगत “आर.एन.बागला” हे प्रसिध्द उद्योगपती होते. त्यांचे मराठवाड्यातील उद्योग जगतात भरीव योगदान होते. मराठवाड्यातील उद्योग क्षेत्राला चालना देण्याचे काम त्यांनी नेहमीच केलेले आहे. त्यांच्या योगदानाची आठवण सतत शहरवासीयांना रहावी, व एक आदर्श व्यक्तिमत्व जनतेसमोर सतत असावे, याच भावनेतून महानुभाव चौक ते ए.एस.क्लब, टी.जंक्शन (सेंट जॉन शाळेपर्यंतच्या) रस्त्याला “आर.एन.बागला” महामार्ग असे नाव देण्यासाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक:-श्री.विकास रतनलाल जैन अनुमोदक:-श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत

मा.महापौर : प्रस्ताव मंजुर.

इति.स.सा सभा दिनांक १६-४-२०१८
(कार्यक्रम पत्रिका क्रमांक-१०)

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानुभाव चौक ते ए.एस.क्लब, टी.जंक्शन (सेंट जॉन शाळेपर्यंतच्या) रस्त्याला "आर.एन.बागला" महामार्ग असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

श्री.त्र्यंबक तुपे :प्रश्नांची उत्तरे सदस्यांना मिळाली. ज्यांना मिळाली नाही ते प्रश्न घ्यावे.

मा.महापौर :नगर सचिव यांनी कार्यवाही करावी.

या बरोबर राष्ट्रगिताने सभा संपविण्यात येते.

दिलीप दत्तात्रय सुर्यवंशी,
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद